महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

मिळून सारेजण करू द्विजगण रक्षण !

# पक्षिमित्र

रजि. नं. महा./285/98/ नागपूर

संपादक : किरण मोरे


- वर्ष – पंधरावे
- अंक २ रा
- १ जानेवारी २०२५






महाराष्ट्र पक्षिमित्र संघटना, कार्यालय, अमरावती वनविभाग अमरावती तसेच वन्यजीव पर्यावरण संवर्धन संस्था,अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने वडाळी बांबू गार्डनमध्ये पक्षी सप्ताहचे उद्घाटन पार पडले.



पक्षिसप्ताहच्या निमित्ताने निसर्गकट्टा, अकोला, वन्यजीव विभाग व महाराष्ट्र पक्षिमित्र यांच्या संयुक्त विद्यमाने काटेपूर्णा अभयारण्यातील वनरक्षक, वनमजूर व गाईड यांच्यासाठी पक्षीनिरीक्षण व माहिती संकलन कार्यशाळेचे आयोजन.










महाराष्ट्र पक्षिमित्र संघटना आणि पेठ वडगांव येथील निसर्गप्रेमी मित्र संस्थेच्यावतीने पक्षीसप्ताह निमित्त्य सिध्देश्वर देवराई येथे पक्षिनिरीक्षण कार्यक्रम संपन्न



पक्षीसप्ताह निमित्त निसर्गसाथी फाऊंडेशन, हिंगणघाट व महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे पक्षी निरीक्षण कार्यक्रम घेण्यात आला.

**संपादक**

**श्री. किरण मोरे**

विद्यापीठ कॉलनी,एम.आय.डी.सी.रोड, मनोर मांगल्य जवळ,
अमरावती ४४४ ६०६
मो.९९२३९१००३४ Email - kiranmorey1983@gmail.com

**मार्गदर्शक**

**डॉ. निनाद शहा** सोलापूर

**श्री. अविनाश कुबल** ठाणे

## कार्यकारिणी

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | – | **डॉ. जयंत वडतकर**, अमरावती<br>**मो. ९८२२८७५७७३** |
| कार्याध्यक्ष | – | **डॉ. राजू कसंबे**, ठाणे<br>**मो. ९००४९२४७३१** |
| संघटक | – | **प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे**, अहमदनगर<br>**मो. ९८५०२९१३२४** |
| कार्यवाह | – | **प्रा. डॉ. गजानन वाघ**, अमरावती<br>**मो. ९८२२२०४०७०** |
| सहकार्यवाह | – | **श्री. शरद आपटे**, सांगली<br>**मो. ९८९०३८४४००** |
| सहसंघटक | – | **डॉ. अनिल माळी**, नाशिक<br>**मो. ९८५०८९८६४४** |
| सदस्य | – | **प्रा. डॉ. निनाद शाह**, सोलापूर<br>**मो. ९४२२४५९९१५** |
| सदस्य | – | **श्री. किशोर गठडी**, औरंगाबाद<br>**मो. ९४२२२०२६२८** |
| सदस्य | – | **श्री. दिलीप विरखडे**,वर्धा<br>**मो. ७७७५८८३८६१** |
| सदस्य | – | **श्री. अविनाश कुबल**,ठाणे<br>**मो. ९३२४२३८०३१** |
| सदस्य | – | **कु. रूपाली मढवी**,मुंबई<br>**मो. ९८६९५५९९२२** |

## सल्लागार मंडळ

| | | |
|---|---|---|
| **श्री. भाऊ काटदरे** | **(चिपळूण)** | **मो. ९४२३८३१७००** |
| **श्री. दिगंबर गाडगीळ** | **(पूणे)** | **मो. ९८८१०७९७११** |
| **डॉ. दिलीप यार्दी** | **(औरंगाबाद)** | **मो. ९४२२७०४२२१** |
| **डॉ. अनिल पिंपळापुरे** | **(नागपुर)** | **मो. ९८८१७१३४६६** |
| **श्री. बापुसाहेब भोसले** | **(अहमदनगर)** | **मो.९८२२६३३१३३** |

**मुखपृष्ठ –**
**छायाचित्रकार –** श्री. देवेंद्र म. तेलकर,
वन्यजीव पक्षी अभ्यासक,अकोला
**छायाचित्राचे ठिकाण –** पी.डी.के.व्हि. अकोला
**छायाचित्रातील पक्षी –**'ठिपकेदार पिंगळा' Spotted Owlet



## संपादकीय...
### सप्ताहमधून संवर्धन

मानवाचा प्राचीन इतिहास ते भविष्य याचे अद्भूतरीत्या विश्लेषण करणारे लेखक युव्हाल नोवा हरारी. ज्यांचे पुस्तक प्रकाशित होणे ही विश्वातील मोठी घटना समजली जाते. ते मागील महिन्यात आपल्या नेक्सस या पुस्तकाच्या प्रचारासाठी भारतात येऊन गेले. सोशल मिडीयावरील लल्लनटॉपला दिलेल्या मुलाखतीमध्ये ते म्हणतात. Most Information its junk. Truth is Expensive. कारण खरं जाणण्यासाठी तुम्हाला संशोधन करावे लागते. त्याचे योग्यतऱ्हेने विश्लेषण करावे लागते. त्यात उर्जा व पैसे खर्च होतात. त्यामुळे खर लिहण महाग पडतं. जे की फिक्शन स्वस्त आहे. त्याचा प्रचार प्रसार सहजपणे करता येतो. तुम्ही काही पण लिहू शकता. त्यांमध्ये संशोधन, पैसा, वेळ फारसा लागत नाही. Truth is Complicated and Fiction explain simple story. जगामध्ये जी काही माहिती मोठ्या प्रमाणात पसरविली अथवा पोहचविल्या जाते ती जास्त करून खरी नसते आणि जशी जशी नवीन तंत्रज्ञानामधून ही माहिती आपल्यापर्यंत पोहचेल, ती अधिकाअधिक फिक्शनचे स्वरूप घेईल. अर्थातच जे आपल्याला खरं ज्ञान देणार नाही. त्यातून आपण हुशार अथवा समजूतदार बनणार नाही. या माहितीच्या जंजाळापासून पक्षी विश्वही कसे अपवाद राहिल. यातसुद्धा संशोधनात्मक ज्ञानापेक्षा बऱ्याचदा खोटी माहितीच पसरविली जाते. पक्ष्याला एकदा माणसाने हात लावला की त्यांना ईतर पक्षी टोचून मारतात. चातक पक्षी पावसाच्या पाण्यावरच जिवंत राहतात. पक्ष्यांना खाद्य, पाणी नियमितपणे दिल्याने त्यांचे संवर्धन होईल. वगैरे. या गोष्टींवर बहुसंख्य चटकन विश्वास ठेवतात. त्यामुळे निसर्गाच्या अन्नसाखळीतील महत्वाच्या या घटकाचे सामान्यीकरण होऊन जाते.

याठिकाणी पक्षीविषयातील तज्ञ व्यक्ती, पक्षीअभ्यासक, निरीक्षक यांच्याकडून होणाऱ्या जनजागृतीची समाजाला खरी गरज भासते. दरवर्षी महाराष्ट्र पक्षीमित्र तर्फे साजऱ्या होणाऱ्या पक्षी सप्ताहामध्ये नेमके ते साध्य केले जाते. भारतातील पक्षीविश्वाचे सखोल संशोधन करून ते जागतिक स्तरावर पोहचविणारे डॉ सालीम अली व अरण्यऋषी मारुती चितमपल्ली या दोघांचा वाढदिवस नोव्हेंबर महिन्यात येतो.

५ ते १२ नोव्हेंबर हा आठवडा पक्षी सप्ताह म्हणून साजरा करण्याची मागणी महाराष्ट्र पक्षीमित्र तर्फे करण्यात आली. शासन दरबारी त्या मागणीचा पाठपुरावा करण्यात आला. याची दखल घेत शासनाने हा आठवडा पक्षी सप्ताह म्हणून साजरा करण्यास मान्यता दिली. २०१७ मध्ये राज्यात प्रथम पक्षी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. पक्षीमित्रचे आजीवन सभासद, पक्षीविषयक कार्यरत महाराष्ट्रातील संस्था तसेच राज्यभरातील पक्षीनिरीक्षकांनी हा सप्ताह साजरा करायला सुरवात केली.आताच्या वेगवान विकास होत जाणाऱ्या काळात पक्ष्यांची जैवविविधताही तेवढीच झपाट्याने कमी होत आहे.ई-बर्ड या पक्ष्यांच्या जागतिक संकेतस्थळाच्या अहवालानुसार भारतातील १७८ पक्षी प्रजातीना  त्वरित संवर्धन देणे गरजेचे आहे. अन्यथा त्या विलुप्तीच्या मार्गावर लागतील. भारतातील व राज्यातील पक्ष्यांचे महत्व त्याची खरी माहिती प्रत्येक नागरीकापर्यंत पोहोचविणे. तसेच पक्ष्यांच्या संवर्धनाप्रती जबाबदारी स्पष्ट व्हावी यासाठी जनजागृती करण्याचा व्यापक प्रयत्न या पक्षी सप्ताहात दिसून आला. त्यात पक्ष्यांवरील व्याख्याने, पक्षीनिरीक्षण सहल, शाळांमध्ये विद्यार्थींना मार्गदर्शन, पक्षी संशोधन सादरीकरण, पक्षी छायाचित्र प्रदर्शन असे विविध कार्यक्रम मोठ्या प्रामाणात घेण्यात आले. दरवर्षी घेण्यात येणाऱ्या पक्षी सप्ताहातून ही जनजागृती वाढतच राहिल. त्यातून पक्षी संवर्धनाचा उद्देश बऱ्याचअंशी साध्या करता येणार.

जानेवारीच्या या अंकामध्ये यावर्षी साजरा करण्यात आलेल्या सप्ताहातील काही कार्यक्रमाची माहिती व छायाचित्रे आहेत. विशेष लेखामध्ये महाराष्ट्र पक्षीमित्रचे कार्यवाह डॉ गजानन वाघ यांनी पाणथळ जागेमध्ये भटक्या श्वानांपासून पाणपक्ष्यांना वाढलेल्या धोक्याबद्दल अवगत केले आहे. ड्रॅगनफ्लायवर पीएचडी केलेल्या डॉ पवन राठोड यांनी त्याची शास्त्रीय माहिती सांगितली. तसेच पक्षी व ड्रॅगनफ्लायच्या सहसंबधाचे छान निरीक्षण लिहिले आहे. तरुण पक्षीअभ्यासक अनिल उरतवाड यांनी आपल्या लेखात जिंतूर तालुक्यातील येणोली तळ्याचे महत्व पक्ष्यांच्या दृष्टीने अधोरेखित केले आहे. कोकणातील श्रीवर्धनचे कालींजे गावातील सागरकिनारी येणारे स्थलांतरीत पक्ष्यांची माहिती पक्षी अभ्यासक शंतनू कुवेसकर यांच्या लेखात आपल्याला वाचायला मिळते. पक्षीनिरीक्षक आशिष बंड यांनी लाजरी पाणकोंबडी व परिसरातील इतर पक्ष्यांचे सुंदर निरीक्षण नोंदविले आहे. एखाद्या दुर्मिळ पक्ष्याचे छायाचित्र घेण्यामागे किती प्रयत्न करावा लागतो याची कल्पना आपल्याला 'छायाचित्राची गोष्ट' या सदरामध्ये समृद्धी पानसरे यांच्या लेखात येते. पुस्तक समिक्षणामध्ये प्रा. डॉ.निनाद शहा सरांनी माणिक पुरी यांच्या तळे,पक्षी,माळरान या पुस्तकांचे व डॉ. राजु कसंबे यांनी डॉ. किरण मोरे यांच्या थाई थाई या पुस्तकाचे सुंदर रितीने समीक्षण केले आहे सलग बारा वर्षापासून पक्षीमित्रच्या अंकामध्ये पक्ष्यांच्या पोस्टतिकीटांवर लिहिणारे श्री रवींद्र वामनाचार्य यांनी यावेळी क्रॅब प्लोअर तिकीटाची माहिती आपल्या सदरामध्ये करून दिली आहे. असा हा आपला अंक निश्चितच वाचकांच्या पसंतीस उतरेल यात शंका नाही. सरतेशेवटी वर्षाला निरोप देऊन आपल्या वाचकांना व सर्व सभासदांना नविन वर्ष भरभराटीचे जावो ही सदिच्छा.

*****


## ३७ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन शेवगाव,

### ता. शेवगाव, जि-अहिल्यानगर (अहमदनगर)

**आयोजक :- न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शेवगाव**

३७ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन १ व २ फेब्रुवारी २०२५ रोजी न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शेवगाव, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर (अहमदनगर) या ठिकाणी संपन्न होत आहे. तरी या संमेलनात आपण सहभागी व्हावे ही महाराष्ट्र पक्षिमित्र संघटना व आयोजकांच्या वतीने नम्र विनंती करण्यात येत आहे. नाव नोंदणीसाठी संस्थेच्या वेबसाईट वर तसेच समाजमाध्यमांमध्ये लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी खालील व्यक्तींशी किंवा इमेल वर संपर्क करू शकता.

**डॉ. यु. डी. शेरखाने** (७९७२०५६४०८) **प्रा. सचिन पवार** (९६८९७०१०५२)

Email : pakshimitrasammelan2025nacscs.ac.in

# * अध्यक्षीय *



**डॉ. जयंत वडतकर**
अध्यक्ष,महाराष्ट्र पक्षीमित्र
jayantwadatkar.wecs@gmail.com

नमस्कार, नववर्षाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

नेहमीप्रमाणे नोव्हेंबरमध्ये पक्षी सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा केला गेला. महाराष्ट्र पक्षिमित्र कडून २०१७ पासून सुरु केलेला पक्षी सप्ताहास राज्य शासनातर्फे मान्यता मिळावी यासाठी पक्षिमित्रांतर्फे केलेल्या मागणीस शासनाने २०२० साली मान्यता दिली आणि तेव्हापासून हा सप्ताह शासन स्तरावर सुद्धा साजरा केला जातो. त्यालाही आता चार वर्षे उलटून गेलीत, त्यामुळे आता हा विषय जवळपास सर्वच स्तरापर्यंत पोहोचल्याने तो साजरा करण्याची परंपरा रूढ झाली ही आनंदाची बाब म्हणावी लागेल. या पक्षी सप्ताहानिमित्त्याने अनेक वृत्तपत्रे इलेक्ट्रॉनिक मिडिया सुद्धा स्वयंस्फुर्तीने या उपक्रमास प्रसिद्धी देत आहेत. आपल्या सभासदांनी अनेक राज्यात ठिकाणी या निमित्त्याने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. त्या सर्व सभासदांचे व विविध स्थानिक संस्थांचे अभिनंदन व आभार.

आपल्याला माहिती आहे की विद्यार्थी पक्षिमित्र संमेलन हा उपक्रम सर्वप्रथम अकोला येथे निसर्ग कट्टा यांचेकडून सुरु करण्यात आला होता. या वर्षी सुद्धा येत्या जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात अकोला येथे होऊ घातले आहे. शालेय विद्यार्थ्यांमध्ये पक्षी निरीक्षण या छंदाबद्दल आवड निर्माण करण्यासाठी व त्या माध्यमातून पक्षी व पर्यावरण संर्वधनाचे बीज पेरणारा हा उपक्रम संपूर्ण राज्यासाठी दिशादर्शक असा आहे.

महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे देण्यात येणाऱ्या २०२४ च्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून, यावर्षीचा पक्षीमित्र जीवन गौरव पुरस्कार पंढरपूर येथील श्री. गोविंद रघुनाथ सबनीस यांना जाहीर करण्यात आला. इतर पुरस्कारांमधे पक्षी संवर्धन व सुश्रुषा पुरस्कार निपाणी, जि. बेळगाव येथील श्री. फिरोज गुलाब चाऊस यांना तर पक्षी जनजागृती पुरस्कार वर्धा येथील राहुल प्रदीप वकारे यांना जाहीर करण्यात आला आहे. यावर्षीपासून नव्याने सुरुवात झालेल्या पक्षी विषयक साहित्य पुरस्काराची घोषणा सुद्धा यावेळी करण्यात आली. यावर्षीचा पहिला पक्षी साहित्य पुरस्कार परभणी येथील श्री. माणिक प्रल्हाद पुरी यांना जाहीर करण्यात आला. पक्षी सबंधित विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांचा गौरव व्हावा या उद्देशाने महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे २०१९ पासून या पुरस्कारांची सुरुवात करण्यात आली असून यामध्ये यावर्षी एकाची भर पडल्याने पुरस्कारांची संख्या आता पाच इतकी झाली आहे. या पुरस्कारांसाठी दानदात्यांनी जी रक्कम महाराष्ट्र पक्षिमित्रला दिली त्यामधून दरवर्षी हे पुरस्कार देण्यात येतात. स्व. रमेश लाड्खेडकर स्मृती जीवन गौरव पुरस्कारासाठी विदर्भ पक्षिमित्र मंच द्वारे डॉ. अनिल पिंपळापुरे यांनी दाननिधी गोळा करून दिला, तसेच स्व. डॉ. जी.एन वानखेडे स्मृती पक्षी संशोधन पुरस्कारासाठी स्व. डॉ. जी.एन वानखेडे यांचे मेमोरिअल फंड मधून डॉ. जयंत वडतकर व डॉ. गजानन वाघ व आमचे सहकारी मिळून दाननिधी दिला. पक्षी संवर्धन व सुश्रुषा पुरस्कार नागपूर येथील महाराष्ट्र पक्षिमित्रचे सदस्य श्री. अनिल बहादुरे यांचे तर्फे प्रायोजित करण्यात आला आहे. पुरस्कार स्व. रामभाऊ शिरोडे (वाणी) स्मृती पक्षिमित्र पक्षी जनजागृती पुरस्कार श्री. अविनाश शिरोडे, नाशिक यांचे तर्फे प्रायोजित करण्यात आलेला आहे. तसेच यावर्षीपासून नव्याने सुरु करण्यात आलेला श्रीमती सुशीला पाटकर स्मृती पक्षी साहित्य पुरस्कार मुंबई येथील अॅड. चंदना साळगावकर यांचे दान निधीमधून सुरु करण्यात आला आहे. या सर्व दानदात्यांचे महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे मनपूर्वक आभार. या सर्व पुरस्कारांचे वितरण येत्या ३७ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनात करण्यात येणार आहे. सर्व पुरस्कार विजेत्यांचे महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे हार्दिक अभिनंदन!

महाराष्ट्र पक्षिमित्रचे पुढील ३७ वे संमेलन अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव येथे १ व २ फेब्रुवारी २०२५ रोजी होत आहे. त्याचवेळी शेवगाव येथून जवळच असलेले जायकवाडी येथे स्थलांतरित पक्ष्यांचे संमेलन सुद्धा भरणार आहे. संमेलनाची नोंदणी लवकरच सुरु होणार असून त्याची माहिती आपल्यापर्यंत पोहोचविण्यात येईल तसेच आपल्या वेबसाईट वर सुद्धा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तेव्हा आपण संमेलनात भेटणार आणि जायकवाडीला सुद्धा भेट देणार आहोत. त्या अनुषंगाने प्रत्येक जिल्ह्यात या निर्णयाची अंमलबजावणी व जनजागृती व्हावी याकरिता महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे स्थानिक स्थरावर दरवर्षी निवेदन देण्यात येत असते. आता मकर संक्रांत आली आहे व पतंग व मांजाचा व्यवसाय या काळात जोरात असतो, मांजामुळे रस्त्यावर अपघात होण्याचे, गळा कापला जाण्याचे प्रमाण यावर्षी मोठ्या प्रमाणात वाढल्याचे वृत्तपत्रातील बातम्यावरून लक्षात येत आहे. याच कारणाने राष्ट्रीय हरित लवाद (NGT) कडून नायलॉन/ चायनीज मांजाच्या व्यापार, साठवणूक, विक्री व वापरावर दि. ११ जुलै २०१७

च्या निर्णयानुसार सरसकट बंदी घालण्यात आली आहे. NGT च्या या आदेशानुसार नायलॉन/चायनीज मांजाच्या व्यापार, साठवणूक, विक्री व वापरावर सरसकट बंदी घालण्यात आली आहे. ही कारवाही करण्यासाठी सदर आदेशामध्ये Environment (Protection) Act 1986; Prevention of Cruelty of Animal Act 1960; Wildlife (Protection) Act 1972; Indian Pinal Code ई कायद्या अंतर्गत कारवाही करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. हा निर्णय आल्यानंतर, स्थानिक प्रशासन मांजा जप्तीची कारवाई करतांना सुद्धा दिसत आहे. मात्र त्यानंतरही मांजा वापर कमी झाल्याचे दिसत नाही. याचाच अर्थ लोकांना काहीही पडलेले नाही. आपल्या आनंदासाठी हजारो पक्ष्यांचे बळी जातात, रस्त्यावर मोटारसायकल स्वरांचे गळे चिरले जातात याचे गांभीर्य मांजा वापरणाऱ्यांना कधी येणार. त्यासाठी जनजागृतीची मोठ्या प्रमाणात आवश्यकता आहे. तसेच वापरणाऱ्यांवर व विक्री करणाऱ्यांवर पोलीस, पालिका प्रशासन व वन विभाग यांनी स्थानिक स्तरावर मोठ्या प्रमाणात कारवाई सुद्धा करणे गरजेचे आहे. त्यासाठी आपले पक्षिमित्र दरवर्षी प्रशासनाला निवेदन सुद्धा देत असतात. अनेक पक्षिमित्र विविध माध्यमातून जनजागृती सुद्धा करीत असतात. हे सर्वच ठिकाणी, प्रत्येक गावात होणे गरजेचे आहे. पक्षिमित्र म्हणून आपण ती जबाबदारी पूर्ण करण्याचा प्रयत्न करू या. मिळून सारे जन । करू व्दिजगण रक्षण ।।

*****

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

महाराष्ट्र पक्षिमित्र, नागपूर रजी.नं. महा./ २८५/ ९८ / नागपुर या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा शनीवार दि. ०१ फेब्रुवारी २०२५ रोजी न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शेवगाव जि. अहिल्यानगर येथे सायंकाळी ६.०० वाजता, येथे ३७ व्या महाराष्ट्र राज्य पक्षिमित्र संमेलना दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. तरी संस्थेच्या सर्व सन्माननीय आजीवन सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

**सभेपुढील विषय**

१) मागील सांगली येथे दि. २३ डिसेंबर २०२३ ला पार पडलेल्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) संस्थेचा मागील वर्षीचा (२०२३- २०२४) जमाखर्च, अहवाल व ताळेबंद यास मंजुरी देणे.

३) आगामी वर्षभरातील (२०२५-२६) कार्यक्रमांची रूपरेषा ठरविणे.

४) महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे पक्षी सप्ताह मध्ये आयोजित कार्यक्रमांचा आढावा घेणे व सर्व आयोजनकर्त्यांचे अभिनंदन करणे.

५) महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे देण्यात येणाऱ्या पुरस्काराची माहिती देणे तसेच नवीन पुरस्कार सुरु करण्याबाबत चर्चा करणे तसेच दानदात्यांचे अभिनंदन करणे.

६) सन २०२४-२०२५ च्या (डिसेंबर पर्यंत) च्या खर्चास आणि २०२५-२६ साला साठीच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

७) सन २०२४-२०२५ सालासाठी अंतर्गत हिशेब तपासनीस ठरविणे.

८) सन २०२५-२६ ते २०२७-२०२८ या तीन वर्षाच्या कालावधीसाठी संस्थेचे मा. अध्यक्ष तथा १० कार्यकारिणी सदस्य यांची निवड करणे.

९) विभागीय समन्वयक आणि जिल्हावार निमंत्रित सदस्य यांची नेमणूक करणे.

१०) मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

पक्षिमित्र
ठिकाण : अमरावती
दि. ०१/०१/२०२५

आपला विश्वासू
**डॉ. गजानन वाघ**
कार्यवाह, महाराष्ट्र

**सूचना :** गणसंख्ये अभावी सभा तहकूब झाल्यास, सभेच्या कामास सभेच्या नियोजित वेळेनंतर अर्ध्या तासांनी त्याच ठिकाणी सुरुवात करण्यात येईल. अश्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही आणि मुळ सभेपुढे विचारासाठी आलेल्या सर्व कामांचा व विषयांचा विचार करण्यात येईल.

विशेष लेख

# पक्षी जीवन आणि भटकी कुत्री



**प्रा. डॉ गजानन वाघ**
पक्षीसंशोधक व
कार्यवाह महाराष्ट्र पक्षिमित्र
Email - gajuwagh252424 @rediffmail.com

आपल्याला प्रश्न पडला असेल की पक्षी आणि भटकी कुत्री यांचा काय संबंध आहे? परंतु गेल्या काही वर्षांमध्ये भारतात भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात वन्यप्राणी,पक्षी,लहान मुले, महिला, पुरुष व इतर पाळीवप्राणी जखमी झालेले किंबहुना मारले गेलेले आहे. अश्या संबधित वर्तमानपत्रात आलेल्या अनेक बातम्या आपल्याकडून वाचण्यात आल्या असतील. भटक्या कुत्र्यांची संख्या अतिशय वेगाने संपूर्ण भारतात वाढत चालेली आहे, याचा धोका भारतातील समृद्ध अश्या विविध प्रदेशातील जैवविविधतेला तसेच मानवी आरोग्याला सुद्धा मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला आहे. तस पाहिलं तर प्राचीन काळापासून कुत्रा हा मनुष्य जमातीसाठी उपयोगी ठरलेला आहे. आपल्या घराचे, शेताचे, पाळीव प्राण्यांचे व कुटुंबीयांचे रक्षण करण्याकरिता मानवा कडून कुत्र्यांचे पालन-पोषण केले गेले आहे. परंतु अलीकडे मात्र मोकाट कुत्र्यांची संख्या गावामध्येच नव्हे तर शहरात सुद्धा भरमसाठ वाढलेली आहे आणि यामुळेच त्यांचा घातक परिणाम हा पाळीव प्राणी, जंगलातील प्राणी, जलचर प्राणी आणि खुद्द मानव जमातीवर नकारार्थी होऊन राहिलेला आहे. एकीकडे मानवाचे रक्षण करणारा रखवालदार आता मात्र मानव जमातीच्या जीवावर उठलेला आपल्याला पाहायला मिळत आहे. जगातील अनेक विकसित देशांच्या तुलनेत विकसीनशील देशांमध्ये या भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. सध्या भारतामध्ये जवळपास ६२ मिलियन इतकी संख्या या भटक्या कुत्र्यांची आहे. सरकारी पातळीवर या भटक्या कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण मिळविण्याकरता प्रयत्न चालू आहे, परंतु अजूनपर्यंत याला यश आलेलं नाही. भटक्या कुत्र्यांच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्देशानुसार या भटक्या कुत्र्यांना आपण मारून टाकू शकत नाही किंवा त्यांना दुसऱ्या प्रदेशात सोडू शकत नाही फक्त त्यांच्या वाढत्या संख्येला आळा घालण्याकरिता त्यांची शस्त्रक्रिया (नसबंदी) करून प्रजनन पूर्णपणे थांबवू शकतो. परंतु एकंदरीतच शासकीय यंत्रणेच्या कुचकामी पद्धतीमुळे या भटक्या कुत्र्यांचा प्रादुर्भाव वाढलेला आहे आणि याचा परिणाम आपल्याला वन्यजीव आणि पक्षी यांच्या अधिवासावर दिसून येत आहे हे मात्र खरे. बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी, मुंबई यांनी तर स्वतंत्रपणे भटक्या कुत्र्यांच्या संदर्भात एक लेह-लद्दाख सारख्या व हिमालयातील जंगलामध्ये वन्यजीवांना कसा धोका निर्माण झालेला आहे त्याचप्रमाणे हि भटकी कुत्रे माणसावर सुद्धा कसे हल्ले करीत आहे आणि अनेक लहान मुलांना व महिलांना ते आपली शिकार बनवीत आहे या संदर्भातील वास्तव मांडणारी डॉक्युमेंटरी बनवलेली आहे यावरून आपल्याला लक्षात येईल की या भटक्या तथा मोकाट कुत्र्यांच्या अंध प्रेमापोटी वाढत चाललेली त्यांची संख्या ही वन्यजीव, पक्षी आणि त्याच बरोबर मनुष्य जमाती करिता सुद्धा येणाऱ्या काळात धोक्याची घंटा ठरणार यात किंचितही शंका नाही. अलीकडेच वाचण्यात आलेल्या वृत्तपत्रातील बातमीचा मी आपल्याला संदर्भ देतो की उत्तर प्रदेशातील भाताच्या शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात आढळणारा व पूर्णपणे निवासी असणारा उंच, सुंदर आणि तेथील शेती परिसंस्थेचा एक भाग असलेला सारस पक्षी हा भटक्या कुत्र्या कडून मारल्या जात आहे. सारस पक्षी हा दलदलीच्या भागामध्ये विण करतो. भाताचे पीक घेणाऱ्या अनेक राज्यांमध्ये हा पक्षी प्रामुख्याने आढळतो व तिथे तो भाताच्या शेतामध्ये एक उंच अशी जागा तयार करून आपली अंडी देतो. परंतु वाढत्या भटक्या कुत्र्यांच्या टोळीमुळे फक्त त्यांचे अंडेच नव्हे तर अंड्यावर बसलेल्या मादीला सुद्धा या कुत्र्यांनी समूहाने लक्ष करून मारले आहे. धरण, गावाजवळील तलाव, मालगुजारी तलाव छोटे-मोठे पाणवठे अश्या प्रकारच्या विविध पाणथळी भागांमध्ये विण करणाऱ्या इतर अनेक पक्षी प्रजातींना त्यांचा धोका निर्माण झालेला आहे यामध्ये टिटवी, माळ टिटवी, छोटा कंठेरी चिखल्या,केंतीश चिखल्या,भारतीय धाविक,छोटा आर्ली, कंठेरी आर्ली, नदी सुरय, छोटा सुरय, रंगीत पाणलावा, शेकाट्या, वारकरी, जांभळी पाणकोंबडी, कमळ पक्षी अशा अनेक पाणपक्षांच्या पिलांना व त्यांच्या घरट्यांतील अंड्यांना ही भटकी कुत्री दरवर्षी नष्ट करीत आहे आणि यामुळेच या पाणपक्षांच्या संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात आपल्याला घट झालेली पाहायला मिळत आहे.







नदी टिटवी, नदी सुरय, मोठा करवानक, भारतीय करवानक यासारख्या पक्षी प्रजाती करिता वाहत्या नद्या हा प्रमुख अधिवास आहे. या पक्षी प्रजाती नदी परीसंस्थेचा व तेथील अन्न साखळीचा एक घटक आहे आणि त्यांचं अस्तित्व या नदी परीसंस्थेवर टिकून आहे परंतु या भटक्या कुत्र्यांचा वावर नदीपात्रांमध्ये सुद्धा वाढलेला आहे आणि यामुळेच उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये नदीपात्रातील तयार झालेल्या बेटांवर नदी टिटवी, नदी सुरय, मोठा करवानक, भारतीय करवानक, यासारख्या पक्षी प्रजातींची विण होत असते. या पक्षी प्रजाती आ.यु. सी. एन. च्या धोकादायक यादीमध्ये समाविष्ट झालेल्या आहे. या परंतु गेल्या काही वर्षापासून या पक्ष्यांची घरट्यातील अंडी मात्र या मोकाट आणि चटकलेल्या कुत्र्यांकडून खाल्ली जात आहे. अमरावती जिल्ह्यातील पाणथळींचा, नदी परीसंस्थेचा व तेथील पक्षी जैवविविधतेचा अभ्यास करीत असताना अशा प्रकारचे भंयकर वास्तव्य सामोर आलेले आहे. भटक्या कुत्र्यांच्या संदर्भात शासकीय पातळीवर ठोस अश्या काही उपाय योजना केल्या गेल्या नाही आणि भटक्या कुत्र्यांच्या या संख्येवर नियंत्रण मिळवले गेले नाही तर मात्र या गवताळ तशेच पाणथळ प्रदेशातील अधिवासात असणाऱ्या अनेक पक्षी प्रजाती येणाऱ्या काळामध्ये पूर्णपणे नष्ट झाल्या शिवाय राहणार नाही हे तितकेच खरे. पक्षी जीवन समृद्ध ठेवण्याकरिता पक्षीमित्रांनी यासंबंधी आवाज उठवण्याची गरज आहे.



*****

## काटेपुर्णा अभयारण्यातील वनरक्षक करणार पक्ष्यांची आंतरराष्ट्रीय ई-बर्ड वर नोंद.

## *पक्षीसप्ताह निमित्त ई-बर्ड प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न*


अकोला. निसर्ग अभ्यासक श्री. मारोती चिंतमपल्ली व थोर पक्षीतज्ञ स्व. सालिम अली यांच्या जयंती निमित्त दि. ५ ते १२ नोव्हेंबर २०२४ दरम्यान आयोजित पक्षी सप्ताहाच्या निमित्ताने निसर्ग कट्टा, अकोला वन्यजीव विभाग व महाराष्ट्र पक्षिमित्र यांच्या संयुक्त विद्यमाने काटेपुर्णा अभयारण्यातील वनरक्षक, वनमजूर व गाईड यांच्यासाठी पक्षी निरीक्षण व माहिती संकलन कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या होत्या. या कार्यशाळेबद्दल अधिक माहिती देतांना निसर्ग कट्टाचे श्री. अमोल सावंत म्हणाले की, जंगलामध्ये कार्यरत असणारे वनरक्षक, वनमजूर व गाईड हे नेहमी जंगलात असतात, त्यांना पक्ष्यांविषयी माहिती देवून त्यांना त्या भागातील पक्ष्यांची माहिती ई-बर्ड या अँप द्वारे संकलन करून ती माहिती जगाला उपलब्ध व्हावी तसेच जगातील पक्षी अभ्यासकांना आपल्या भागातील पक्ष्यांची माहिती व्हावी या साठी या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळेस १३० पक्ष्यांचे फोटो व नावं असलेले फोल्डर देण्यात आले. या फोल्डर वरून त्यांना पक्षी ओळखणे व ई-बर्ड ॲप वर माहिती अपलोड करणे सोपे होईल . काटेपुर्णा अभयारण्यील कार्यशाळेत पक्षीमित्र डॉ. संतोष सुरडकर, विभाग प्रमुख, वनस्पती शास्त्र, जी.एन. ए. कॉलेज बार्शीटाकळी, यांनी ई-बर्ड या ॲप बद्दलची माहीती व काटेपुर्णा अभयारण्यातील पक्षी या विषयावर श्री. अमोल सावंत, विभागीय समन्वयक महाराष्ट्र पक्षीमित्र व संस्थापक निसर्ग कट्टा यांनी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन द्वारे माहीती दिली.

अकोला वन्यजीव विभागाचे वन परिक्षेत्र अधिकारी श्री. पवन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेचे सुत्रसंचालन वनरक्षक श्री. अमोल पोटे यांनी केले तर कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र पक्षीमित्र चे सदस्य श्री. अभिजीत चिम व गाईड श्री. नागसेन आकोडे यांनी सहकार्य केले.

*****

# ड्रॅगनफ्लाय व पक्षी यांचे मधील साम्य आणी त्यांचे पर्यावरणातील महत्व



**डॉ. पवन राठोड**
पक्षीअभ्यासक,अमरावती
Email - poneprince@gmail.com

मी प्राणीशास्त्राचा विद्यार्थी असल्यामुळे एके काळी किटकांचा अभ्यास करीत असतांना मला ड्रॅगनफ्लाय बद्दल कुतुहल निर्माण झाले आणी त्यांच्या अभ्यासाकडे मी वळलो, त्यांचे मधील रंगबिरंगी विविधता, त्यांच्या तळ्याकाठी दिसणाऱ्या कलाबाजी, नरांचे आपापसात होणाऱ्या लढाया खुप रंजक वाटायच्या. कधी तासनतास उदर (abdomen) वर करून एका ठिकाणी बसुन राहणाऱ्या तर कधी एका ठिकाणी कधीच थांबा न घेणाऱ्या, कधी सिमेंटच्या भिंतीवर camouflage होवुन लपलेल्या तर कधी आपल्या गडद रंगाने दुरुनच खुणाविणाऱ्या ड्रॅगनफ्लाईज बघायचो आणी रोमांचीत व्हायचो. मग कुतुहलाच्या प्रवाहात जेंव्हा त्यांच्या प्रजनन स्वभावाचा अभ्यास करायला लागलो तेंव्हा त्यांचा प्राणी जगतातील यशस्वीतेचा धागा सापडायला लागला. एक छोटासा किटक त्याच्या प्रजातीला ठिकविण्यासाठी किती जिद्दी व प्रयत्नशील राहु शकतो हे मला त्यातुन जाणवु लागले. इतर ऋतुंपेक्षा पावसाळ्यामधे ड्रॅगनफ्लाय सक्रीय राहत असल्याने त्यांचे दर्शन मोठ्या प्रमाणात होते. आपणही सर्वांनी पावसाळ्यामध्ये कधीतरी तळ्याकाठी निवांत बसुन पक्षी निरिक्षण करीत असतांना रंगेबिरंगी, आकर्षीत करणारे, आपल्या आजुबाजुला भिरभिरणारे हेलिकॉप्टर सारखे किटक बघीतलेले असतील, त्यांच्याबद्धल आपल्या मनात कुतुहलही निर्माण झालेले असणार, परंतु आपण त्याला दुर्लक्षीत केलेले असणार. हा आपल्या आजुबाजुला असुनही नेहमीच दुर्लक्षीत होणरा किटक म्हणजे दुसरा कुणी नसुन 'चतुर' म्हणजेच वैज्ञानिक भाषेत 'ड्रॅगनफ्लाय' आहे. याला काही भागात स्थानीक भाषेत 'भिंगोटा' या नावाने सुद्धा ओळखले जातात. चतुर जेवढा दुर्लक्षीत आहे तेवढाच तो या पर्यावरणाचा समतोल राखण्यात तसेच अनेक जलचर प्राणी, सरिसृप व पक्ष्यांच्या अन्नसाखळी मधील महत्वाचा दुवा सुद्धा आहे.

खरे तर चतुर हा बऱ्याच सजीवांचा आजोबा किटक आहे असे म्हणायला हरकत नाही, कारण तो डायनासॉरच्या आधीच १०० मिलियन वर्षापुर्वी भुतलावर आलेला असल्याचे वैज्ञानिक पुरावे असुन आज त्याचे अस्तित्व ३०० मिलियन वर्ष जुने असल्याचे दिसुन येते. ज्या कालखंडा मधे पृथ्वीच्या भौगोलीक बदलांमुळे जैविक उत्क्रांती घडुन बऱ्याच सजीवांनी स्वताच्या शारीरिक रचनेमधे अनेक बदल केलीत त्याच कालखंडापासुन आजपर्यंत चतुर या कीटकाने त्याचे शारीरिक रचनेमधे आकारमान सोडता इतर कुठलाही बदल केला असल्याचे दिसुन येत नाही. हेच गुपीत त्यांच्या अस्तीत्वाचा ठसा प्राणी जगतामधे उमटवुन अनेक संशोधकांना त्याचेकडे आकर्षित करणारे आहे.

ड्रॅगनफ्लायच्या जीवनचक्राचा विचार केला तर Aquatic आणी terrestrial अश्या दोन भागात विभागले असल्याने व त्याचे सुरवातीचे जीवन चक्र व प्रजनन या करीता पाणी आवश्यक असल्याने त्याच्या जीवनचक्राचा संबध हा अधिक काळ पाणथळ जागेशी येतो. चतुराचे अर्धेअधिक म्हणजेच Larval आयुष्य हे पाण्याच्या आत असल्याने त्याच्या Aquatic life ला अभ्यासने हे अभ्यासकांसमोर एक आवाहनाचे आहे. तरीही काही प्रयोगात्मक अभ्यासातुन असे लक्षात येते की, चतुर हा स्वभावाने मांसाहारी असल्याने अनेक किटक व त्यांची larvae हे त्याच्या आहारात समाविष्ठ आहेत. डेंगु, मलेरिया कारक मच्छरांच्या प्रजातीच्या larvae ह्या त्याच्या आहारात आवडीच्या असल्याने कळत नकळत तो त्यांचे भक्षण करुन मानवी मदत करतो हे नाकारता येणारे नाही. अधीक काळ पाणथळ जागी चतुराचे वास्तव्य असल्याने त्याचा संबध पक्ष्यांशी येणार नाही कसे होवु शकेल. हा किटक आकाराने मोठा असल्याने व इतर काही किटकांप्रमाणे विषारी नसल्याने हा सुद्धा पक्ष्यांच्या अन्नसाखळी मधील आवडीचा आहार आहे. Bee-eater पक्ष्याच्या प्रजनन प्रक्रियेत, आपल्या पार्टनरला लुभविण्यासाठी मौल्यवान भेटवस्तु देतांना चतुराची भेट देत असल्याचे आपल्या पैकी अनेक पक्षीमित्रांनी हे आपल्या कॅमेरा मधे कैद केलेले आहे, हे आपण नेहमीच बघत आलेले आहोत. एवढेच नाही तर चतुरांचे aquatic nymph हे सुद्धा पाणथळ पक्ष्यांच्या आहाराचा मुख्य भाग आहे.

पक्षी आणि चतुर यांचे संबंध अन्नसाखळी पुरतेच नसुन त्यांच्या स्वभावामधे सुद्धा अनेक साम्य असल्याचे अभ्यासातुन दिसुन येते. त्यापैकी प्रजनन व आहाराच्या सुरक्षीततेच्या दृष्टीने प्रदेश (territory) बनविणे हे जसे पक्ष्यांमधे मुख्यत्वे दिसुन येते, तसेच strong territorial

behavior हे चतुरांचे राहते. चतुर मुख्यत्वे प्रजनन काळात पाणथळ ठिकाणी भेट देवुन आपली territory बनवितात. चतुरांच्या विविद्ध प्रजाती नुसार त्यांच्या territory ची लांबी-रुंदी ही भिन्न राहते. परंतु शक्यतोवर मादीला पसंतीस पडेल अश्या प्रजननास आवशक सर्व सोई सुवीधांनी संपन्न Territory ची निवड चतुर करतो व तिचे रक्षण करतो ज्या पद्धतीने पक्ष्यांमधे territorial लढाई ही सामन्यपणे दिसुन येते त्याच पद्धतीची लढाई ही चतुरांमधे प्रदेश रक्षण करतांना दिसते.

जसे पक्षी प्रजननाकरीता आपल्या सहकारी मादीला आकर्षित करण्याकरीता गाणे म्हणून, आपली पंख व त्याच्या रंगांच्या विविध छटा दाखवुन प्रेम प्रदर्शन करतात तसेच प्रेम प्रदर्शन चतुरसुद्धा करतात. चतुर यांनी बनविल्या territory ला जेंव्हा मादी भेट देतात तेंव्हा चतुर आपल्या पंखांचे तसेच उदराच्या रंगांचे प्रदर्शन करुन मादीला आकर्षित करण्याचा प्रयत्न करतात.

पक्षी आणी त्यांचे स्थलांतर जसे पक्षी निरिक्षकांमध्ये अभ्यासाचा व आवडीचा भाग आहे तशीच आवड व अभ्यास चतुरांच्या स्थलांतरावर होणे गरजेचे आहे. कारण चतुरांचे स्थलांतर कमालीचे व अविश्वनिय आहे. फक्त ५ सेमी लांब आकाराची Wandering gilder or Globe skimmer (pantala flavescens) नावाची ड्रॅगनफ्लाय हवेच्या दिशेने glide करीत हिंद महासागर ओलांडून भारत ते आफ्रिकेपर्यंत थांबा न घेता उड्डाण करतात, ज्यामुळे ते जगातील सर्वात लांब नॉन-स्टॉप महासागर ओलांडणारे स्थलांतरीत म्हणुन ओळखल्या जातात. त्यामुळे शास्त्रज्ञांनी Globe skimmer ड्रॅगनफ्लायच्या स्थलांतरित सर्किटचे तपशील उलगडण्यास सुरुवात केली आहे, जी भारत, पूर्व आफ्रिका आणि मध्य आशिया दरम्यान अनेक पिढ्यांमध्ये उडते असे मानले जाते. मध्य भारतात सप्टेंबर महिन्यामधे या ड्रॅगनफ्लायचे थवेच्या थवे आपल्याला प्रवास करतांना दिसले तर नवल नको !

हे तर झाले पक्षी व चतुर यांचेमधील काही साम्य, परंतु पक्ष्यांप्रमाणे किंबहुना त्यापेक्षा ही अधीक महत्वाची पर्यावरणाची जबाबदारीसुद्धा चतुर सांभाळतो. चांगले गुणवत्तेचे पाणी आणि वातावरण असेल तेथे चतुरांची उपस्थीती असते म्हणुन चतुराला चांगल्या पर्यावरणाचे सुचक मानले जाते. चतुर हा शेतकऱ्यांचा व मानवी वस्तींचासुद्धा मित्र आहे. मांसाहारी असल्याने शत्रु किडींचा नायनाट करणे हा त्याचा terrestrial आयुष्याचा मुख्य खेळ आहे. तसेच चतुरांना कुठलेही विषारी शस्त्र किंवा pheromones नसल्याने त्यांचेकडुन मनुष्याला चावणे किंव इजा पोहचविणे असे दिसुन येत नाही.

पक्षी निरिक्षण किंवा अभ्यास करतांना जेवढा कस एका पक्षी निरीक्षकाचा लागतो त्यापेक्षाही अधिक सयंम, वेळ, अचुकता, आणी सतर्कता चतुरांच्या निरिक्षण व अभ्यासाला लागतात. ते आकाराने लहान, दिसायला एकसारखे व रंगेबिरंगी असल्याने त्यांचे छायाचित्र घेणे जरी सोपे वाटत असले तरी त्यांना ओळखणे मात्र कठीण होत जाते. त्यामुळे पाणथळ पक्ष्यांचा अभ्यास करणाऱ्या पक्षी निरीक्षकांनी सोबत ड्रॅगनफ्लायचे निरिक्षण करायला हरकत नाही. एकदा ड्रॅगनफ्लाय आणी डॅम्सेलफ्लाय मधला फरक कळला की, हळु-हळु त्यांच्या अभ्यास व त्यांचेमधील आवड निर्माण होत जाईल. आणी आपोआपच त्यांच्या Common प्रजातींना ओळखणे सोपे होत जाईल. प्राणी जगतातील अद्वीतीय प्रजनन अंग व दृष्टी असणाऱ्या एकमेव प्राण्याच्या अभ्यासामधे आपले योगदान निश्चीत होईल.






# माझे पक्षी निरीक्षण

## लाजरी पाणकोंबडी व इतर पक्षी



**श्री आशिष बंड**
पक्षीअभ्यासक, कारंजा
Email - bandashish@gmail.com

संततधार पावसामुळे कुठे जाणे येणे कठीण झालेले होते. आमच्या घराबाजूस असणारा माळरान विविध झुडपांनी हिरवागार झाला होता. अनेक पशुपक्ष्यांना आश्रयाचे स्थान या छोटयाश्या वनश्रीने दिले होते. त्यातच असलेले काही बाभळीची, उंबराची, रुईची व करंजाची झाडे आपल्या भरगच्च पानांनी सतत पडणाऱ्या पावसापासून छोट्या छोट्या पक्ष्यांना आपल्या कवेत घेऊन निश्चल उभी होती. जणू त्यांचे अप्रत्यक्ष पालकत्वच त्यांनी स्वीकारले होते. जवळच रस्त्याच्या कडेला पावसाचे पाणी जमा होऊन एक छोटा जलाशय तेथे तयार झाला होता. त्याच्या सभोवती छोटीमोठी दाट झाडी तयार झाली होती. काठावरील त्यापैकी काही झाडांवर अनेक छोट्या पक्ष्यांची घरटी सुद्धा होती. त्यात सुगरण पक्ष्यांची खालच्या पाण्याची सुरक्षितता बघून बाभळीच्या फांद्यांना अनेक तयार घरटी लटकत होती. या बाभळीचा काळाशार राकट बुंधा दाट हिरव्या झाडीत एखाद्या काळ्या अस्वलाप्रमाणे लपलेला भासत होता. पिवळेधम्म डोके असलेल्या सुगरणींच्या घरटे विणण्याच्या लगबगीने बाभळीची पिवळी फुले, पाने खाली पाण्यात पडत होती. त्यांचे लटकते सुंदर प्रतिबिंब सुद्धा खाली पाण्यात दिसत होते. दयाळ, मैना, बुलबुल, चिमण्या, शिंपी असे छोटे छोटे पक्षी मधूनच टिपण्यास बाहेर निघत आणि ओलेचिंब होऊन मग फांदीवर आपले अंग फुगवून , पिसे विस्कटून आपल्या चोचीने अंग खाजवित बसत होते. खाली पाण्यात मधूनच एखादा मोठा बेडूक ड्रॉक आवाज करून , टुणकन उडी मारून आपली जागा बदलत होता. पावसाळी वातावरणात त्याचा गर्द पोपटी रंग उठून दिसत होता. अश्या अगम्य जलमय वातावरणात मी आपली दुर्बीण घेऊन घरामागच्या गॅलरीत हे सर्व अवलोकन करीत निवांत बसलो होतो. परिसरातील सर्व झाडे, वेली, प्राणी, पक्षी, कीटक, इत्यादींचा नित्यक्रम न्याहळत होतो.

त्याच जलाशयाच्या काठावरील एका बाभळीच्या झाडावर एक लाजरी पाणकोंबडी राहायची. इकडे तिकडे बघत , स्वतःला सावरत, आपल्या चोचीने पंखांची पिसे उकरत , दबकत बाहेर यायची. बाहेर येताच हळूहळू पाण्याच्या काठाकाठाने आपले भक्ष्य टिपत की असा तिचा नित्यक्रम मी माझा नित्यक्रम सुरू होण्यापूर्वी रोज सकाळी अर्धाएक तास बघत होतो. त्यात जो आंनद मला मिळत होता तो शब्दातीत होता. आजही फिरायची. मधेच वाहनांचा मोठा आवाज, कुत्र्यांचे भुंकणे, किंवा इतर पक्ष्यांचा भीतीयुक्त आवाज आला भुर्रकन घाबरून पुन्हा आपल्या अंधाऱ्या घरात पळून जायची.




मला ती त्याच आविर्भावात दिसली. मात्र मला तिने आज अतिशय सुखद आश्चर्याचा धक्का दिला होता. हा क्षण माझ्या निरीक्षणाचा अनमोल ठरला होता. आज तिने पाण्यात उतरतांना आपल्या मागे एक दोन नव्हे तर चक्क सहा पिल्ले सोबत आणली होती. काळ्याभोर रंगाचे इवले इवले नाजूक पिले तुरुतुरु तिच्या मागे मागे फिरत होती. कधी काठाने तर कधी पाण्यात असे बागडत होती. ती सुद्धा चरताना त्यांची काळजी घेत त्यांना 'मार्गदर्शन' करीत होती. हे विलक्षण दृश्य बघतांना मी देहभान विसरलो होतो. दुर्बीण इतरत्र फिरवावी वाटत नव्हती. काळे शरीर, डोक्यावरील पांढरा पट्टा छाती व पोटापर्यंत, छोटीशी उंच केलेली तपकीरी शेपूट, उंच पाय असलेली ही छोटी पण आकर्षक लाजरी बुजरी पाणकोंबडी अश्याच डबक्या वजा जलाशयाच्या आश्रयाने राहत असते. अतिशय संवेदनशील स्वभावामुळे तिला लाजरी पाणकोंबडी किंवा कुवाक कोंबडी असे मराठीत संबोधतात. इंग्रजीत तिला White Breasted Water Hen असे म्हणतात. पावसाळ्यात किंवा पावसाळा संपता संपता ती सहा सात अंडे घालते. नंतर त्यातून निघालेल्या पिल्लांचे संगोपन करते. संगोपन करताना अनेक संघर्षाला तोंड देते. शिकारी प्राणी पक्षी व मानव यांच्या पासून संरक्षण करून तिचे शेवटी एक दोन पिले वाचतात. असा तिचा साधारण जीवनक्रम असतो. पक्ष्यांचे जीवनच मुळात अतिशय संघर्षमय जीवन असतं. आपण त्यांच्या रंगरुपावर मोहित होऊन एक मनोरंजन म्हणून त्यांच्याकडे बघत असतो. पण त्यांच्या इतके संवेदनशील व संघर्षमय आयुष्य कुणाचेच नसावे. अगदी लहानपणापासून तर मोठे होईपर्यंत कोण केंव्हा हल्ला करेल आणि त्यांचे जीवन संपवेल याची शास्वती नसते. स्वतःची व आपल्या पिल्लांची सुरक्षा करता करता ते जीवन जगत असतात. संगोपन व संघर्ष ह्याच दोन गोष्टी प्रकर्षाने त्यांच्या आयुष्यात दिसतात. आपल्या अर्धा डझन पिल्लांना घेऊन रोज जलाशयाच्या भोवतालच्या झाडीत, काठावर ती चरत असे. ती जिकडे वळली तिकडे त्या काळ्याभोर पिल्लांचा मोर्चा वळत असे. मधूनच आपली पिलावळ आपली सोबत करीत आहेत की नाही याची खात्री मागे वळून बघून करीत होती. पिल्ले सुध्दां मधूनच इकडे तिकडे जाऊन परत तिच्याजवळ येत होती. आजूबाजूच्या झाडीत, दगडात, गवतात चोचा मारीत फिरत होती. जवळपास तास दीड तास चाललेला त्यांचा हा वॉक मात्र अचानक कडालेल्या विजेने उध्वस्त केला.आभाळ काळेशार होऊन सगळीकडे अंधार पडला होता. भर दुपारी सुद्धा सुर्यास्ताचा भास होत होता.

यातच विजेने लक्ख प्रकाश टाकीत आवाज केला तसे सर्व छोटे पक्षी व एरवी भर पावसात चरणारी ही पाणकोंबडी आपल्या पिलांसोबत आडोश्याला गेली होती. आता तिचा हा रोजचा नित्यक्रम मला दिसणार होता. पाऊस जोरात सुरू झाल्याने मी सुध्दा मग माझी दुर्बीण म्यान केली व लाजरी पाणकोंबडी धारावाहिकाच्या पुढच्या मालिकेची अपेक्षा करीत गॅलरीतून घरात आलो.

**निरीक्षण भाग २...**

अगदी जोरात आपला किलकिलाट करीत कीलकीला म्हणजेच खंड्या किंवा धीवर पाणवठ्यावरून उडता झाला. त्याच्या या कर्णकर्कश अश्या आवाजाने मी सुद्धा दचकून गॅलरीत आलो व जलाशय परिसर न्याहाळू लागलो. तो आवाज करून पसार झाला होता तसे सर्व छोटे पक्षी सुद्धा गलका करून जवळपासच्या झाडांवर बसलेले दिसले. इतरत्र वेगवेगळ्या चरणाऱ्या चिमण्या, साळुंक्या, मैना कुणी बाभळी वर तर कुणी इतरत्र जाऊन बसल्या होत्या. आता खार सुद्धा झाडाच्या टोकावर जाऊन आपली शेपटी उडवीत आवाज करीत धोक्याची सूचना देत होती. थोडक्यात सर्वच जलाशय परिसर भयभीत होता. एव्हाना मी सुद्धा दुर्बीण सज्ज करून बसलो होतो. इतक्यात जलाशयाच्या एका काठावरील झाडातून काही हालचाल जाणवली. थोडी फडफड दिसताच मी निरीक्षण करू लागलो. शिकाऱ्याने आपला डाव साधला होता. एक शिक्रा आपल्या पायात एक छोटा पक्षी दाबून बसलेला होता. त्याच्या पंजातील मजबूत पकडीतून त्या बिचाऱ्या पक्ष्याला बाहेर निघणे अशक्य होते. पण त्याची धडपड सुरू होती. अतिशय बेमालूमपणे शिक्रा आपला डाव साधतो. लहान सहान पक्षी, त्यांची छोटी पिल्ले, सरडे इत्यादी त्याचे खाद्य. आपल्या अणकुचीदार नख्याने दाबून, पकडुन जिवंतपणीच वक्र चोचीने त्याचा फडशा पडण्यास सुरुवात करतो. एक पक्षी दुसऱ्या पक्ष्याला आपले भक्ष्य बनवून खात होता. प्राणी पक्षी जगतातील रीत पूर्ण करीत होता. एकाच्या बलिदानाने दुसरा आपली उपजीविका साधत होता. जैवअन्नसाखळीतील हे उदाहरण बघत मी गंभीर झालो होतो. कुणाची अंडी, कुणाची पिल्ले, कुणाची आई केंव्हा कुणाची शिकार होऊन बाकी पोरके होतील याचा नेम नव्हता. मात्र पाणकोंबडी कुठे दिसत नव्हती. मला तिचीच काळजी लागली होती. इवले इवले पिल्ले घेऊन फिरताना तिला किती काळजी घ्यावी लागत असेल. घरात राहताना एखादा सर्प कधीही येऊन पिल्लांना खाऊ शकतो. चरतांना शिक्रा सारख्या शिकारी पक्ष्याची, एखादे पिलू कधीही उचलून नेण्याची कायम भीती. परिसरात वावरणारी मोकाट कुत्री सुद्धा पाळतीवरच असायची. कदाचित या थरार नाट्यामुळे ती पिलांना घेऊन घरातच असावी. पिल्ले सोबत असताना पक्षी अतिशय सावध असतात. सर्व लक्ष त्यांचे पिल्लांकडे असते. त्यांच्यासाठी चारा आणायला जातांना नर मादी पैकी कुणी एकजण घरट्यावर लक्ष केंद्रित करते. ज्यांचे जमिनीवर घर असते ते पक्षी अधिक सावध असतात व इतरांना सुद्धा सावध करतात. थोडासाही धोका वाटल्यास परिसरात जर टिटवी असेल, तर अतिशय कर्कश ओरडुन सर्वांना त्याची माहिती देते. एखादा प्राणी, मानव किंवा कुठलाही अडथळा किंवा आपत्ती वाटल्यास जोर जोरात ओरडून सैरभैर उडते. लक्ष विचलित करण्यास पंख तुटल्यागत जमिनीवर उडून नाटक करते. पिले जिथे आहे तेथून शिकाऱ्याचे लक्ष विचलित करते. आपल्या पिल्लांबद्दल ते खूप संवेदनशील असतात. सातभाई समूहाने राहतात पण धोका दिसताच खूप जोरात टे..टे. असा कोलाहल करून सर्वांना सावध करतात. प्रत्येक पक्ष्याचा संकट काळी काढलेला आवाज हा वेगळा असतो. खार सुद्धा यावेळेस त्यांना खूप मदत करते. झाडाच्या शेंड्यावर जाऊन आपली शेपटी हवेत उडवत सावध आवाज करते. निसर्गाने एकमेकांसाठी या इमर्जन्सी आलार्म ची व्यवस्था करून ठेवली आहे. जंगलात सुद्धा हिंस्त्र प्राणी जेंव्हा दृष्टीस पडतात, तेंव्हा तृणभक्षी प्राणी एकमेकांना सूचित करतात ते विशिष्ट आवाज काढूनच. एव्हाना इतर पक्षी पूर्ववत आपापल्या कामात लागले होते. खारुताई सुद्धा केंव्हाच आपल्या लगबगीत व्यग्र झाली होती.




आता पाऊस संपलेला होता. मात्र त्याच्या पाऊस खुणा अस्तित्वात होत्याच. खड्ड्यात बऱ्यापैकी पाणी साचलेलेच होते. काठावरील झाडे झुडपे गर्द झालेली होती. पाण्यात शेवाळ व इतर जल वनस्पती मुळे अनेक सहपक्षी सुद्धा आज दिसत होती. दोन तीन वंचक शांत मुद्रेत पाण्याकाठी बसलेले दिसले. मधूनच फटकन आपली लांब चोच पाण्यात मारून एखादी छोटी मासोळी गट्टम करित होते. मोठा बगळासुद्धा एकीकडे निवांत उभा होता. साधू समाधी लावून संधी साधत होता. इतक्यात पाणकोंबडीने जलाशयावर प्रवेश केला. मला तिला बघून विलक्षण आनंद झाला. जवळपास पंधरा दिवसांनी परत एकदा मी तिला बघत होतो. पण माझा आनंद क्षणात हिरमुसला तो तिची फक्त तीनच पिले बघून..! तिची तब्बल तीन छोटीशी काळी पिल्ले कुठे दिसत नव्हती. कदाचित ती थोडी मागे असतील म्हणून मी अस्वस्थ होऊन बारकाईने न्याहाळू लागलो पण काही केल्या ती दृष्टीक्षेपात येत नव्हती. पिले थोडी मोठी वाटत होती. माझ्या मनात हुरुहुर जाणवू लागली. कुठे गेली असतील बाकी पिल्ले याच विचारात मी गढून गेलो. बिचारी पाणकोंबडी आपले उंच पाय झपाझप टाकीत टिपत होती तशी पिल्ले पण तिच्या मागे टिपत तिचा मागोवा घेत होती. कुठल्या शिकाऱ्याने घात केला होता अनाकलनीय होते. आपले आभाळाएवढे दुःख पचवून उर्वरित पिल्लांचे संगोपन करण्यात ती व्यग्र झाली होती. डोळ्यासमोर घडलेल्या प्रसंगाचे भांडवल न करता पुढे मार्गक्रमण करीत होती.

मधेच थांबून चोचीने पिसे उकरत, इकडे तिकडे बघत किनाऱ्यावर चालत पिलांसहित खड्ड्याच्या एका चिंचोळ्या भागात जाऊन दृष्टीआड झाली. मी गंभीरपणे डोळ्यांची दुर्बीण काढली. मात्र तोच विचार डोक्यात कायम होता. आप्त स्वकीयांचा विरह माणसाला जगू देत नाही. माणूस कित्येक दिवस स्वतःला सावरल्या जात नाही. प्राणी पक्षी मात्र लगेच कामाला लागतात. त्यांना कुणाच्या सांत्वनाची गरज नसते की दुखवटा नसतो. शो मस्ट गो ऑन तत्वावर सर्व निरंतर चालू असते. थोडा विचारातच , मात्र मी सुद्धा मग कामाला लागलो...


**निरीक्षण भाग ३**

पाऊस थांबून बरेच दिवस झाले होते. उन्हाच्या कडक तडाख्याने जमिनी सुकल्या होत्या. समोरच्या खड्ड्यातील संपूर्ण पाणी सुकून फक्त शेवाळ तेव्हढे शिल्लक होते. त्यामुळे जलाशय हिरवागार दिसत होता. मधे मधे उंच गवताच्या काही पात्या सर्वत्र विरळपणे उभ्या होत्या. खड्याच्या वरच्या सभोवतीच्या माळरानावर दाट झाडी उत्पन्न झाली होती. प्रत्येक वृक्ष वेली आपला वेगळा हिरवेपणा दर्शवित होते. माझ्या गॅलरीच्या अगदी खाली , कंपाऊंडवॉलच्या बाहेरून मी काही झाडे लावून ठेवली होती. ती आता हिरवीगार होऊन पानांनी भरगच्च झालेली होती. त्यातील एका दाट झालेल्या कंचनच्या झाडाच्या बुंध्याशी दोन दयाळ पक्षी मला संशयास्पद उड्या मारताना दिसले. मधेच चिर.. चीरर आवाज सुद्धा करीत होते. मी बारकाईने बघू लागलो. इतक्यात झाडाच्या आळ्यात काहीतरी हालचाल जाणवली. आणि लगेच लक्षात आले एक मातकट रंगाची जवळपास सात फुटाची धामण सावध होऊन पुढे सरकत होती. तिची दिशा कंपौंड वॉल कडेच असल्याने मी सुद्धा सावध झालो. कदाचित तिला इकडे यायचे असेल किंवा पक्ष्यामुळे ती विचलित झाली असावी. आता आजूबाजूला असणाऱ्या चिमण्या व इतर पक्ष्यांना सुद्धा खबर लागल्याने ते सुद्धा आवाज करायला लागले होते. बराच वेळ तिथे शांत राहून मग तिने निर्णय घेतला व लगेच आपला मोर्चा उलट दिशेला वळवला अन् दाट झाडीत सळसळ करीत दिसेनाशी झाली. पाऊस बंद होऊन जमीन उन्हाच्या उष्णतेने तापताच साप बाहेर निघतात. परिसरातील छोटे छोटे पक्षी, अंडी मिळाल्यास त्यांना उत्तमच. उंदीर, बेडूक सुद्धा या वेळेस त्यांना उपलब्ध होतातच. त्याच अनुषंगाने स्वारी बाहेर निघाली होती पण कदाचित पक्षांच्या सतर्कतेने तिला आपला मार्ग बदलावा लागला असे मला वाटले. धामण साप बिनविषारी असतो. पण मनुष्य त्याला विनाकारण ठार मरतो. शेतातील उंदीर तिचे मुख्य खाद्य म्हणूनच तिला रॅट स्नेक म्हणतात. एकदा रस्त्यावर शेतालगत एक जवळपास नऊ फुटाची भली मोठी पिवळी सुंदर धामण मारून टाकलेली मी बघितली. जवळ जाऊन शेपूट धरून उचलून धरली होती. इतकी सुंदर कांती असलेली धामण विनाकारण कुणीतरी अज्ञानी माणसाने मारलेली होती. साप , घोरपड लोकं विनाकारण मारून टाकतात. निसर्गात विनाकारण हस्तक्षेप केल्याशिवाय मनुष्याला चैन नाही पडत. समोरील बाभळीच्या झाडावर स्थलांतर करून आलेला ग्रे बेलिड कुक्कु (राखाडी पोट असलेली पावशा) कर्कश आवाज करीत उडत उडत येऊन बसला होता. मागच्या वर्षी फक्त त्याचा आवाज ऐकूनच समाधान मानावे लागले होते. परिसरात कुठे असून सुद्धा दिसला नाही.

आज मात्र त्याने स्वतःहूनच दर्शन दिले होते. पोटाचा भाग राखाडी रंगाचा असतो. पावशाप्रमाणेच दिसायला असणारा पण आकाराने बुलबुल इतका छोटा असतो मात्र त्याची शिळ खूप दूर पर्यंत ऐकू येते. दरवर्षी हा नियमित येथे येतो. परिसरात फिरतो. वार्बलर सारख्या छोट्या पक्ष्याच्या घरट्यात आपले एक अंड हा घालतो. स्वतः घरटे न करता आपल्या पिल्लाचे दुसऱ्या पक्षाला संगोपन करायला लावतो. कोकीळ पक्ष्यांमधील सर्वच प्रकारचे भाईबंद हे स्वतः घरटे करीत नाहीत. कावळा, सतभाई, शिंपी, बुलबुल, वटवट्या अश्या अनेक आपल्या आकाराच्या किंवा त्याही पेक्षा छोट्या पक्ष्यांच्या घरट्यात ही जात अंडी घालते. पुढे हे पक्षी त्यांची पिल्ले वाढवतात. मग ही पिले परत आपल्या मायदेशी स्वतःहूनच रवाना होतात. निसर्गाची किमया अगाध आहे. अनेक पक्षी स्थलांतर करून परदेशातून येथे येतात. येथे अंडी घालतात आणि निघून जातात. पुढे त्यांची पिले मोठे होऊन स्वतःहुनच मायदेशी निघून जातात. थोडावेळ शीळ दिल्यानंतर मात्र तो उडता झाला. इकडे जलाशयातील पाण्यातील शेवाळात काहीतरी हालचाल जाणवली. मी लगेच दुर्बीण घेऊन बघू लागलो. लाजरी पाणकोंबडी दोघेही नर मादी खूप जोरात गोल गोल धावत होती. ते असे का करीत आहेत हे बघण्यास मी अजून बारकाईने बघत होतो. तोच एक मुंगूस तिथे फिरताना आढळला. मुंगूस सुद्धा एक शत्रू या पक्षांचा आहे. त्याला बघताच टिटवी ने मात्र टाहो फोडला. जोर जोरात ओरडत ती सभोवती उडू लागली. त्यामुळे परिसरातील सर्व छोटे पक्षी सावध होऊन तिला साथ देत झाडांवर जाऊन बसले. मुंगूस सुद्धा या पक्ष्यांची अंडी खातो. थोड्या वेळ फिरल्यावर आपली डाळ शिजत नाही बघून तो सुद्धा पसार झाला. पाणकोंबडी आता परत जोड्याने फिरताना दिसली. दिवस रात्र नित्याने या सर्व गोष्टी पक्ष्यांच्या जगात घडत असतात. थोड्या थोड्या वेळचे आपण त्याचे साक्षीदार व्हायचे. त्यांच्या कडून बरेच काही शिकायचे. एकाच ठिकाणी बसून सुद्धा नित्याने आपण पक्षी निरीक्षण करू शकतो. सातत्याने असे निरीक्षण केल्यास आपल्याला त्यातून बऱ्याच गोष्टींचा अभ्यास होतो. हे यावरून लक्षात येते.



# येणोली गावचे तळे



**श्री. अनिल उरटवाड (कोहकाळ)**
पक्षीअभ्यासक जिंतुर (जैनपुर)
Email - aniluratwad@gmail.com

जंगलाचे प्रमाण कमी असणारा, चारही दिशांनी माळरांनी वेढलेला जिंतुर (जैनपुर) आज अनेक पक्ष्यांचा महत्त्वाचा अधिवास असलेला तालुका. जिंतुरपासून सात किलोमीटर अंतरावर असलेल्या येणोली गावाच्या शेजारी, गावच्या पिण्याच्या पाण्याचा आणि सिंचनासाठी लागणाऱ्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी तलाव आहे. काही गावकरी या तलावात मत्स्यपालन करून मासेमारीचा व्यवसाय करतात. गावच्या लोकांच्या पोटाचा संभाळ करणारा हा येणोली तलाव. पक्ष्यांसाठी महत्त्वाचा अधिवास झालेला आहे. स्थानिकांकडून केली जाणारी मासेमारी आणि भटक्या कुत्र्याचे धोके सोडता, या ठिकाणी इतर दुसरा कुठलाही त्रास नाही. येणोली तलाव पक्ष्यांना वनस्पती, पृष्ठवंशी आणि अपृष्ठवंशी प्राण्यांच्या स्वरूपात अन्न पुरवत असतो. तलावाच्या बाजूला असलेल्या ओल्या जमिनीतील वनस्पतीची फळे, कंद आणि पाने खातात. तलावातील झुडपे, पाणवनस्पती विविध जलचर हे पाणी शुद्ध करण्याचे काम करतात. वातावरणात ऑक्सिजन सोडतात. जे पक्ष्यांसाठी उपयुक्त असते. तलावावर काणूक बदक, तिरंदाज यापक्ष्यांच्या प्रथमच नोंदी घेण्यात आल्या. येणोली गावच्या या तलावावर पक्ष्यांसाठी रात्रनिवाऱ्यासाठी आवश्यक असलेल्या जागा दिसून येतात. अनेक पक्ष्यांनी प्रजननासाठी निवडलेला हा तलाव किती महत्त्वाचा आहे यातून अधोरेखित होते. येथे टिटवी, माळटिटवी, नदीसुरय, टिबुकली, लाजरी पाणकोंबडी, वारकरी, चंडोल या पक्ष्यांच्या प्रजनन काळातील नोंदी घेतल्या आहेत. चक्रवाक सारख्या सुंदर स्थलांतरित पक्ष्यांना हा तलाव सर्वात आधी खुणावतो. हिवाळ्याच्या सुरुवातीलाच चक्रवाक येथे येऊन राहतात. संकटसमीप प्रजाती (नीअर थ्रेटेड स्पेसिस) श्रेणीमध्ये येत असलेल्या संवर्धन प्राधान्य असलेल्या काळ्या डोक्याचा शराटी, रंगीत करकोचा, युरोपियन निलपंख, नदीसुरय, तिरंदाज या पक्ष्यांच्या महत्त्वाच्या नोंदी घेण्यात आल्या आहेत. पाण्यातील उंचवटा असलेल्या भागात बेशरमाच्या काड्यात सलग एका ओळीत थोड्या थोड्या अंतराने शेकाट्यांचे चार घरटे निदर्शनास आले. घरट्यातील जोडीदाराचे अंडी उबवण्याचे कार्य नेमून दिलेल्या वेळापत्रकानुसार चालत असे. उन्हाळ्याचे दिवस उष्ण तापमान अंगाची पार लाहीलाही झालेली पळसाच्या झाडाच्या खोडालगत आडोशाला थोड्याशा सावलीत बसून शेकाट्या पक्ष्यांच्या घरट्यांची निरीक्षणे नोंद करत असे. याच पळसाच्या झाडावर फुलांतील मधुरस पिण्यासाठीची सूर्यपक्ष्यांचे तंटे होत असत. नदीसुऱ्याचा कर्ण कर्कश आवाज सारखा तलावाच्या परिसरात घोंगावत असे.पाणकावळे शिकारीसाठी जलाशयात उतरले. त्यांच्या या सामूहिक शिकार करण्याच्या पद्धतीला पाहून मी कोणीही अवाक होईल. पाणकावळे समूहाने पाण्यात पोहत माशांना पळवत काठाकडे आणत असे.

काठावर उडत फडफडत करत असलेल्या माशांवर ताव मारत असत. पाणकावळ्याची पोटं भरून झाल्यावर काळ्या मातीच्या बेटावर पंख उघडून वाळवत असत. या आभाळ वाटांच्या प्रवाश्यांना कवते घ्यावसं वाटतं. तालुक्यातील तलाव व पक्ष्यांचे आवडते खाद्य येथे उपलब्ध असल्याने मोठ्या संख्येने स्थलांतरित पक्ष्यांचे आगमन होण्यास सुरुवात झाली आहे. हजारो किलोमीटरचा प्रवास करून नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारी या शीत महिन्यात ते येत असतात. पक्ष्यांचा मुक्काम या तलावावर असतो. रंगीबेरंगी पक्ष्यांची निरीक्षणे करता करता दिवस कसा सूर्यास्ताकडे जातो कळत नाही. मिळून सारे जन करू व्दिजगण रक्षण.




*****

# शोरबर्ड मायग्रेशन :

## महाराष्ट्राच्या किनारपट्टीवरील आश्चर्यांची एक झलक श्रीवर्धनचे कालिंजे गाव



**श्री. शंतनु कुवेसकर**
पक्षीअभ्यासक (माणगाव)
Email - shantanu.kuveskar@gmail.com

अरबी समुद्रालगत ७२० किलोमीटर पेक्षा जास्त पसरलेला अप्रतिम किनारा असलेले महाराष्ट्र राज्य पक्षीनिरीक्षक, छायाचित्रकार आणि पक्षीशास्त्रज्ञांना हिवाळ्यात पर्वणीच घेऊन येते. महाराष्ट्राच्या किनाऱ्यांवरील सर्वात आकर्षक गोष्ट म्हणजे किनाऱ्यावरील पक्ष्यांचे हिवाळ्यातील वार्षिक स्थलांतर. विशेषतः, रायगड जिल्हा, श्रीवर्धनमधील मोहक काळींजे गाव, त्यातील मूळ वालुकामय परिसर आणि खारफुटी हिवाळ्यात विविध स्थलांतरित पक्ष्यांच्या प्रजातींसाठी एक महत्त्वाचा थांबा आहे.

दरवर्षी, ऑगस्टच्या अखेरीपासून ते एप्रिलच्या सुरुवातीपर्यंत हजारो किनारी पक्षी महाराष्ट्राच्या किनारपट्टीच्या पाणथळ प्रदेशात आणि वालुकामय किनाऱ्यांवर येतात. हे स्थलांतर हा एक उल्लेखनीय प्रवास आहे, ज्यामध्ये पक्षी त्यांच्या प्रजननाच्या ठिकाणापासून हजारो किलोमीटर प्रवास करून सायबेरिया आणि उत्तर युरोप सारख्या ठिकाणी कडाक्याच्या थंडीपासून वाचण्यासाठी किंवा चीनमधूनही उष्ण हवामानात मुबलक अन्न स्रोत शोधण्यासाठी भारतात येतात. भारतातील हिवाळी पक्षी मध्य आशियाई फ्लायवे वापरतात.

श्रीवर्धनमधील काळींजे खारफुटीची समृद्ध परिसंस्था या पक्ष्यांसाठी एक आदर्श निवासस्थान देते, ज्यामुळे ते पक्षीनिरीक्षणाचे प्रमुख स्थान बनत आहे. महाराष्ट्र राज्य वनविभागाने काळींजे हे पक्षीनिरीक्षण आणि खारफुटीच्या बोट सफारीसाठी पर्यावरण पर्यटन केंद्र म्हणून प्रचारित केले आहे, पक्षीनिरीक्षक आणि छायाचित्रकार हिवाळ्यात किनाऱ्यावरील हजारो पक्ष्यांचे निरीक्षण आणि छायाचित्रे काढण्यासाठी येथे बोट सफारी करू शकतात. महाराष्ट्र वनविभागाने काळींजे येथील खारफुटीच्या पर्यटन गटाला कांदाळकन्या नावाची मोटरबोट देखील उपलब्ध करून दिली आहे. काळींजे गावातील स्थानिक महिला, पुरुष आणि मच्छीमार बांधवांचा हा पर्यटन गट आहे त्यांच्यामार्फत येथे पर्यटन करण्यात येथे.

या प्रदेशातील सर्वात सामान्यपणे आढळणाऱ्या किनारी पक्ष्यांपैकी तुतवार, चिखल्या, कुरव, व्हिमब्रेल्स, लहान कोरल, युरेशिअन कोरल, सामान्य टीलवा, हिरवा तुतवार , पाणलावे , सुरय , समुद्री काळे बगळे आणि कालवफोडे आणि चिंबोरी खाऊ, रंगीत भाट तितर हे असामान्य पक्षी आहेत. छोटा कंठेरी चिखल्या गळ्यावरील त्याच्या वेगळ्या काळ्या पट्ट्यासह, बहुतेकदा समुद्रकिनाऱ्यावर आणि वाळूच्या किनाऱ्यावर फिरताना आढळतात. तुतवार जसे की सामान्य तुतवार आणि बाकचोच तुतारी, छोटा आणि मोठ्या चिखल्यासारखे पक्षी देखील त्यांच्या अनोख्या आहाराच्या सवयींसाठी ओळखले जातात हे पक्षी अपृष्ठवंशी प्राण्यांसाठी वाळूत व गाळात चोचीने तपासणी करतात. पक्षी छायाचित्रकार या पक्षी हालचालींच्या कृती छायाचित्रबद्ध करण्याच्या संधीचा आनंद घेतात.

श्रीवर्धनच्या किनाऱ्यावर छोटा आणि मोठा सुरय मोठ्या संख्येने स्थलांतर करतात आणि काही कुरव चोचीचे सुरय देखील त्यांच्या मोहक उड्डाणामुळे आणि आकर्षक पिसाऱ्या द्वारे ओळखले जातात. समुद्रात त्यांच्या सुंदर डुबक्यांचे निरीक्षण करणे हे अनुभवी पक्षीनिरीक्षक आणि नवोदितांसाठी एक मेजवानी आहे. सूर्य क्षितिजावर मावळत असताना हजारो पक्ष्यांचे मुक्काम परतताना एक चित्तथरारक देखावा निर्माण होतो, जो काळींजे येथे पाहणाऱ्यांना भुरळ घालतो.

या स्थलांतराचे पर्यावरणीय महत्त्व कमी लेखले जाऊ शकत नाही कारण किनारी परिसंस्थांचे आरोग्य राखण्यासाठी स्थलांतरित किनारी पक्षी महत्त्वाची भूमिका बजावतात. कीटकांच्या लोकसंख्येवर नियंत्रण ठेवून आणि बियाणे पसरवून, ते त्यांच्या हिवाळ्याच्या मैदानात जैवविविधतेला प्रोत्साहन देण्यास मदत करतात. शिवाय, त्यांची उपस्थिती किनारपट्टीच्या अधिवासाच्या एकूण आरोग्याचे सूचक म्हणून कार्य करते, ज्यामुळे त्यांच्या स्थलांतरण पद्धतींचा अभ्यास संवर्धनाच्या प्रयत्नांसाठी महत्त्वपूर्ण आहे.

श्रीवर्धनमधील काळींजे खारफुटी आणि वालुकामय तांडा हौशी आणि अनुभवी पक्षीनिरीक्षक व शास्त्रज्ञांसाठी एक आदर्श अधिवास प्रदान करते. मानवी क्रियाकलापांच्या कमीतकमी त्रासासह क्षेत्र शांततापूर्ण निरीक्षणासाठी उत्तम आहे. महाराष्ट्र वन विभागाचे आणि मॅन्ग्रोव्ह सेलचे स्थानिक उपक्रम पर्यावरणीय पर्यटनाला चालना देणारे ठरत असून येथील पर्यटन भरभराटीस येऊ लागले आहेत. येथे पर्यटकांना महाराष्ट्राच्या किनारपट्टीच्या नैसर्गिक सौंदर्याची जाणीव करण्यास प्रोत्साहित केले जाते. समुद्रकिनारा, जवळील पाणथळ प्रदेश, खारफुटीची जंगले, प्रत्येक अनोखे अनुभव देतात.

पक्ष्यांच्या स्थलांतराची गुंतागुंत आणि या अधिवासांचे संरक्षण करण्याकरिता आपण सखोल अभ्यास करत असताना, आपण समुदायाच्या सहभागाची भूमिका देखील ओळखली पाहिजे. रायगडमधील स्थानिक समुदायांना त्यांच्या सभोवतालच्या पर्यावरणीय खजिन्याची जाणीव होत आहे.

मी गेल्या १५ वर्षांपासून महाराष्ट्राच्या किनाऱ्यावरील विविध ठिकाणांना भेट देत आहे, विशेषत: रायगड जिल्हा आणि श्रीवर्धनच्या किनारपट्टीच्या भागात, ही ठिकाणे मला सापडलेल्या एका नयनरम्य ठिकाणापेक्षा अधिक आहेत; स्थलांतरित किनारी पक्ष्यांसाठी हा एक महत्वाचा आश्रय आहे. आपला सोशल मीडिया भरून काढण्यासाठी फक्त पक्ष्यांचे फोटो/छायाचित्र काढणे ही वेगळी गोष्ट आहे पण पक्षीनिरीक्षणाचे चमत्कार ज्ञात करून, स्थलांतर, जीवनचक्र आणि पक्ष्यांची वर्तणूक जाणून घेऊन आणि संवर्धनाच्या प्रयत्नांना पाठिंबा देऊन, या किनारी परिसंस्थांचे सौंदर्य पुढील अनेक वर्षे अबाधित राहील याची आपण खात्री करू शकतो.






*****

## स्वागत नवीन सभासदांचे
### (दिनांक ०१ एप्रिल २०२४ ते ३० जून २०२४ )

| क्र. | गाव | नाव | फोन नं. | ई. मेल |
|---|---|---|---|---|
| १६१३ | वर्धा | श्री. प्रशांत कान्हाजी हिवानी | 9822859060 | pkhiwani@gmail.com |
| १६१४ | बदलापूर | श्री. संदेश कृष्णा कदम | 9930150531 | sandeshkadam@gmail.com |
| १६१५ | अकोला | मंजुश्री गोविंद कुलकर्णी | 9850322678 | mkmanjukulkarni@gmail.com |
| १६१६ | कोल्हापूर | श्री. राजेंद्र कृष्णराव घोरपडे | 9011087406 | rajghorpade1971@gmail.com |
| १६१७ | अमरावती | श्री. मनोज किशोर बिंड | 8668380722 | manojbind2012@gmail.com |
| १६१८ | अहिल्यानगर | श्री. रणजीत रावसाहेब राऊत | 9960650385 | ranjitraut@gmail.com |
| १६१९ | अहिल्यानगर | श्री. गणेश झुंबर जामोदे | 9960114765 | gjamode7@gmail.com |
| १६२० | अहिल्यानगर | मृणाली दत्तराव परदेशी | 9309939224 | shivkanyapardeshi@gmail.com |

छायाचित्राची गोष्ट

# भिगवणच्या पक्षीमेळ्यातील मुकूटमणी : बहिरी ससाणा



**सौ.समृद्धी पानसरे**
छायाचित्रकार,निसर्गप्रेमी, पुणे
Email - samrudhdipansare@gmail.com


भिगवण म्हटलं की डोळ्यांसमोर येतात ते फ्लेमिंगो म्हणजेच स्वर्गीय रोहित पक्षी. बरेच जण नुसते फ्लेमिंगो बघायला भिगवणला भेट देतात. उजनी धरणाचा जलाशय म्हणजे वेगवेगळ्या जातीच्या पक्षांचे नंदनवनच जणू. हिवाळ्यात स्थानिक तसेच दूरदेशातून वेगवेगळे पक्षी हजारो किलोमीटरचा प्रवास करून येथे आश्रयास येतात म्हणूनच त्याला महाराष्ट्रातील भरतपूर असं म्हटलं जातं..

पुण्यापासून भिगवण जेमतेम १२० किलोमीटर अंतरावर आहे. आम्ही पक्षी प्रेमी आणि हौशी फोटोग्राफर वर्षातून जवळपास दोनदा तरी भिगवणला भेट देत असू.पण दर वेळेस आमची एक दिवसाची ट्रीप असायची त्यामुळे एका दिवसात हाती लागेल तेवढयावरच समाधान मानायला लागायचं. पहाटे तीन वाजता निघून रात्री दहा वाजेपर्यंत घरी असा कार्यक्रम असायचा. या वेळेसही आमची एकच दिवसाची ट्रीप ठरली. भिगवणला जाण्याच्या ठरलेल्या आदल्या दिवशीच कॅमेरा चेक करून सगळी तयारी करून ठेवली होती. दुसऱ्या दिवशी पहाटे ३ वाजता निघालो... ६ वाजायच्या आतच भिगवणला पोहचलो.. चहापाणी करून लगेच तयार..आम्ही आज दिवसभर गवताळ भागातील पक्षी बघायचे ठरवले होते. दोन्हीही वेळेस आम्हाला वेगवेगळे पक्षी बघण्यास मिळाले.गप्पांमध्ये सध्या जगातील सर्वात वेगवान उडणारा बहिरी ससाणा म्हणजेच (Peregrine falcon) दिसतो आहे असं पक्षी मार्गदर्शकाकडून कळालं. गवताळ प्रदेशातल आत्ताच दुसरं आणि शेवटचं सत्र झाल्यामुळे आम्हाला परतीच्या प्रवासाला निघाव लागणार होतं. मला बहिरी ससाणा बघण्याची खूप इच्छा होती. हा गोल्डन चान्स मला हुकवायचा नव्हता. माझ्या मैत्रिणचं दुसऱ्या दिवशी ऑफीस असल्यामुळे तिने थांबण्यास नकार दिला. ती कॅबने निघून गेली तर माझा परतीचा प्रश्न होता. माझ्या डोळ्यासमोर फक्त बहिरी ससाण्याचं चित्र दिसत होतं आणि फक्त तो बघण्यासाठी मी एकटीने थांबण्याचा निर्धार केला. हा पक्षी पाणथळ जागांवर दिसत असल्यामुळे बोटीची सफारी करावी लागणार होती.ज्या पक्षी मार्गदर्शकाच्या घरी आम्ही थांबलो होतो त्यांनी माझी जेवणाची व राहण्याची उत्तम सोय केली. ससाण्याच चित्र डोळ्यासमोर ठेवत, दमल्यामुळे कधी झोप लागली कळालच नाही. पहाटे माझ्या मोबाईलचा अलार्म वाजण्याच्या आधीच कोंबड्यांचा अलार्म वाजल्याने जाग आली..लगेच आवरून मी आणि स्थानिक पक्षी मार्गदर्शक निघालो.. बोटीतून आमचा प्रवास चालू झाला.. वातावरणात दंव पसरल होतं. झुंजुमुंजु झालं होतं.सूर्यनारायण आपला सोनेरी प्रकाश आसमंतावर पसरवत होते. आमची बोट पाणी कापत वेगाने पुढे जात होती. जसजसं आम्ही पुढे जात होतो तसतसं माझी उत्सुकता शिगेला पोहचत होती.. शेवटी पाण्यात बरेच अंतर कापल्यानंतर एका खांबा जवळ संथपणे थांबलो तर खांबावरती एक राखाडी रंगाचा राजबिंडा पक्षी बसलेला दिसला.. व्यवस्थित निरखून बघितल्यावर आपण चित्रामध्ये बघितलेला हाच तो बहिरी ससाणा ह्याची जाणीव झाली. एवढा आनंद झाला होता कि त्याला काही क्षण बघतच राहिले, फोटो काढायचे विसरूनच गेले.

एक दोन क्लिक घेतले तोपर्यंत हा उडला आणि लांब एका काठावरच्या झाडाच्या फांदीवर जाऊन बसला. आम्ही त्याच्यावर नजर ठेवून होतो. आमची बोट खूप संथपणे त्याच्या दिशेने चालली होती. माझ्या नजरेच्या टप्प्यात तो येताच अजून थोडे फोटो घेतले.. आमची बोट जसजशी त्याच्या जवळ येऊ लागली तसं मी आणि कॅमेऱ्याला सज्ज ठेवलं. सतत पाण्यावर हलणाऱ्या बोटीतून एकसारखे फोटो घेण्याचा माझा हा पहिलाच प्रयत्न होता. माझ्याकडे ट्रायपॉडही नव्हता. एक चांगला फोटो घेण्यासाठी स्थिरतेची आवश्यकता असते. आणि इथे तर बोट सारखीच हलत होती. एकदा क्लिक केलं तर ससाण्याच डोकं फ्रेम मध्ये आलं नाही आणि दुसरा क्लिक केला तर त्याचे पायच गेले. असे माझे ५-६ प्रयत्न वाया गेले. म्हटलं आता काय करावं.. पण २ सेकंद विचार करताच मला नेमकं काय करायला हवं याचं आकलन झालं होतं. सतत हलणाऱ्या बोटीची लय, श्वासावरचं माझं नियंत्रण आणि स्थिर हात यामुळे मी पुढचे सतत ८-१० फोटो चांगले काढू शकले. अशा फोटोग्राफीचा मला आजिबात सराव नव्हता त्यामुळे थोडसं अवघड वाटल पण, आपल्याला जमलं आहे याचा स्वर्गीय आनंद लाभला होता. कदाचित आमच्या अस्तित्वाची जाणीव त्याला झाली असावी आणि मी त्याच्या देखण्या मुद्रा टिपता क्षणी तो उडाला आणि अत्यंत वेगवान आणि चपळतेने क्षणार्धात दिसेनासा झाला. अश्या ३८९ किमी/ताशी वेगवान उडणाऱ्या या ससाण्याचा रंग, शरीराची ऐटबाज ठेवण, वेगळीच जरब असणारे डोळे आणि चपळता दाखवत झाडावरून केलेले अविस्मरणीय असे उड्डाण बघत त्याची सुंदर छबी माझ्या डोळ्यात आणि हो महत्वाचे म्हणजे कॅमेऱ्याच्या कुपीत साठवत मी हर्षोल्लासाने परतीच्या दिशेने निघाले.....

## पुस्तक समीक्षण

# ‘तळे, पक्षी आणि माळरान’



**प्रा. डॉ. निनाद शहा**
कार्यकारिणी सदस्य,
महाराष्ट्र पक्षीमित्र सोलापूर
Email - ninadshah1950@gmail.com

निसर्ग पर्यावरण यावर सिद्ध हस्ते लेखन करणाऱ्या माणिक पुरींचे आणखी एक पुस्तक म्हणजे ‘तळे, पक्षी आणि माळरान’. वेळोवेळी विविध अंक मासिकात लिहिलेल्या लेखांचा हा संग्रह आहे. भटकंतीची आवड असल्याने त्यांच्याकडे निसर्ग विषयक माहितीचा खजिना जमा झालेला आहे आणि तो तसाच स्वतः जवळ न ठेवता आपल्यासमोर ते ठेवत आहेत. पुरींच्या आजींना पक्षी, प्राणी इत्यादी विषयींची आवड असल्यामुळे त्यांनी त्यांच्या विविध गोष्टी लेखकास सतत सांगत राहिल्याने त्यांची आवड लागली. आजीच्या पाखरांच्या रक्षण कार्याचे उदाहरण म्हणून लांडोरीच्या अंडी उबविणाच्या काळात व नंतर पिलांचे रक्षणासाठी त्या किती दक्ष असत तेही लेखकाने लिहिले आहे. पाखरांच्या विविधतेची आजींना माहिती होती, जसे गवत चिमणी, घर चिमणी, पिवळी चिमणी, चंदेरी चिमणी इत्यादी.

याशिवाय त्या आवाजावरुनही पक्षी कोणता हे ओळखत असत हे वाचून आपणास आजीच्या पक्षी व निसर्ग ज्ञानाविषयी कौतुकच वाटते.

तळे पक्षी आणि माळरान या पर्यावरणाच्या तिन्ही घटकांच्या अस्तित्वाविषयी लेखक पदोपदी चिंता व्यक्त करतो. इतर सर्व अधिवासाप्रमाणे माळरानावरही माणसाने ढवळाढवळ केली आहे. माळरानावरील सोलर प्लांटच्या चकाकणाऱ्या पॅनल्स ला पाहून पक्षी गोंधळतात व ते तेथे उतरत नाहीत. अशी अनेक माळराने आता पक्ष्याविना ओकीबोकी वाटतात. याशिवाय भटक्या कुत्र्यांचा वाढता त्रास पक्षी आणि प्राण्यासाठी मोठी धोक्याची घंटा आहे असे लेखक बजावतो.

अस्वलाचे झाड, घारीचे झाड, करकोच्याचे झाड अशा आकर्षक शब्द रचनेमुळे व त्यांच्या अनुभवी निरीक्षणामुळे त्याविषयी काय लिहिले असेल याविषयी आपली उत्सुकता ताणली जाते.

पुस्तकाच्या भाषेत दुर्बोधता अजिबात नाही. अगदी साध्या, सरळ, सोप्या, ओघवत्या आणि शैलीदार भाषेत विविध प्रसंग चितारले आहेत. वाक्ये साधीच पण किती सुंदर आहेत पहा. चुलीवरच्या तव्यासारखं तापणारं माळरान पार गारठून गेलं होतं. पाखराच्या मनात हिरवळ दाटून आलेली म्हणून त्यांच्या आवाजालाही हिरवेपणा मिळालेला. चिंचेचं डेरेदार झाड किती झोपाळलेलं. पाणवनस्पतीचीं फुलं पाण्यावर डोकं काढून ऊन खात बसलेली दिसायची. (जांभळी पानकोंबडी संदर्भात) – निळ्या जांभळा रंग अंगावर ओतून घेतलेला दिसत होता. अशा सौंदर्यपूर्ण वाक्यांची पखरण प्रत्येक लेखात दिसते.

महानुभाव पंथीय साहित्यातून आढळणाऱ्या पक्षी वर्णनांचा माणिक पुरींनी धांडोळा घेतलेला आहे; अभ्यास केला आहे. पक्ष्यांची आवड, पक्ष्यांविषयक लोकसमज, पक्षी स्थलांतर इ. विषयांवर अचूकपणे माहिती श्लोकादी माध्यमातून दिली आहे. लीळाचरित्र, दृष्टांतपाठ सह्याद्रिवर्णन, चंद्रावळी इत्यादी ग्रंथाचा अभ्यास पक्षिमित्रांनी करून ही निरीक्षणे वाचावीत व पुढील पक्षी अभ्यासाकडे वळावे इतकी ही महत्त्वाची आहेत असे लेखकाचे सांगणे आहे. एक उदाहरण देण्याचा मोह होतो, ते म्हणजे या पंथातील महत्त्वाच्या लेखिका धनाइसा खामणीकर यांनी सह्याद्रिवर्णन या ग्रंथात मराठवाड्यात राजहंस, चक्रवाक यांचे वास्तव्य अनेक ठिकाणी असल्याचे लिहून ठेवले आहे. *जेथ सरोवरी बहुवस: चक्रवाक राजहंस । त्यांचे कळरव सुरस: काइ सांगो।। असे म्हणतात की लेखकाचे चांगले वाचन असेल तर तो चांगले लिहू शकतो. माणिक पुरी यांनी प्रसिद्ध पर्यावरण तज्ज्ञांची पुस्तके वाचल्याची जाणीव त्यांच्या लिखाणात जागोजागी आढळते. या तज्ज्ञांच्या अनुभवाशी ते आपल्या परभणी परिसरातील निरीक्षणाशी तुलना करून काही वेगळे आढळतय का हेही ताडून पाहतात.

पुस्तक : तळे पक्षी आणि माळरान
लेखक : माणिक पुरी मुखपृष्ठ : मुकुंद धुर्वे
प्रकाशक : साहित्य प्रसार केंद्र, नागपूर.
मूल्य : रु. १६०/–



माळरानावरील गवतात एकटेच पडलेल्या पाडसाबद्दल व कुबड्या बाभळीवर एकटीच बसून राहिलेल्या पळस मैना बद्दल त्यांच्या मनात किती कणव आहे, किती चिंता आहे हे त्यांच्या लेखनात आपणास सहज जाणवते. त्यांचे हे प्राणी पक्षीप्रेम अनुकरणीय आहे. पळसाची कोवळी दोन पाने तोडून प्रवाहात सोडल्यानंतर ती एका मागोमाग एक वाहत निघाली पण एका वळणावरती अडकली ती पुन्हा निघालीच नाहीत. पानांना वळणावरून पुढे पाण्याबरोबर सोबत जाता आले नाही. माणसाने जीवनात /आयुष्यात वळणावरचा रस्ता पार केला तरच पुढची वाट सुकर होते नाहीतर पळसाच्या पानासारखं अडकून पडावं लागतं. दुसरे कोणीही मदतीला येत नाही. लेखकाने निसर्गावलोकन करता करता जीवनविषयक तत्त्वज्ञान किती सहजपणे सांगितले आहे. माणिक पुरींना माळराने फार प्रिय आहेत ते नेहमी माळरानावर निरीक्षण करीत फिरत असतात आणि त्याचे अनुभव आपल्यापुढे ठेवत असतात. त्यांच्या या माळरानावरील प्रेमामुळे, माळरानावर सतत करीत असलेल्या फेऱ्यांमुळे यांना वारकरी / माळकरी असे गंमतीने म्हणावेसे वाटते.

हे पुस्तक प्रत्येकाने वाचलं तर पाहिजेच पण आपल्या वैयक्तिक संग्रहात प्रत्येक निसर्ग प्रेमीने ठेवावे असे आहे. माणिक पुरींचे सदर पुस्तकाबद्दल हार्दिक अभिनंदन आणि पुढील लेखनासाठी सदिच्छा.

*****

## महाराष्ट्र पक्षिमित्रचे पुरस्कार जाहीर

### पक्षीमित्र जीवन गौरव पुरस्कार श्री. गोविंद सबनीस यांना जाहीर

यावर्षीचा स्व. रमेश लाडखेडकर स्मृती पक्षिमित्र जीवन गौरव पुरस्कार हा दीर्घकाळ पक्षिमित्र चळवळीत राहून, पक्षी संवर्धन व जनजागृती यासाठी कार्यरत पक्षिमित्र, चळवळीतील मार्गदर्शक, पंढरपूर येथील जेष्ठ सभासद श्री. गोविंद रघुनाथ सबनीस यांना जाहीर करण्यात आला आहे. रोख रक्कम, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप असून हा पुरस्कार विदर्भ पक्षिमित्र मंच द्वारे डॉ. अनिल पिंपळापुरे यांचे तर्फे प्रायोजित करण्यात आलेला आहे. दुसरा पुरस्कार पक्षिमित्र पक्षी संवर्धन व सुश्रुषा हा पुरस्कार पक्षिमित्र चळवळीतील पक्षी संवर्धन, तथा जखमी पक्षी प्राणी उपचार आदी क्षेत्रात कार्यरत कर्नाटकच्या बेळगाव जिल्ह्यातील निपाणी येथील प्रसिद्ध वन्यजीव प्रेमी व पक्षी संरक्षक श्री फिरोज गुलाब चाऊस यांना जाहीर करण्यात आला. हा पुरस्कार नागपूर येथील महाराष्ट्र पक्षिमित्रचे सदस्य श्री. अनिल बहादुरे यांचे तर्फे प्रायोजित करण्यात आला आहे. तिसरा पुरस्कार स्व. रामभाऊ शिरोडे (वाणी) स्मृती पक्षिमित्र पक्षी जनजागृती पुरस्कार हा पक्षिमित्र चळवळीत राहून पक्षी अभ्यास आणि पक्षी विषयक जनजागृती आदी क्षेत्रात कार्यरत वर्धा येथील श्री. राहुल वकारे यांना जाहीर करण्यात आला आहे. रोख रक्कम, प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप असून हा पुरस्कार श्री. अविनाश शिरोडे, नाशिक यांचे तर्फे प्रायोजित करण्यात आलेला आहे.

यावर्षीपासून पक्षी या विषयावर सातत्याने लेखन करणाऱ्या साहित्यिक, लेखकांसाठी नवीन पुरस्काराची सुरुवात करण्यात आली असून यावर्षीचा पहिला श्रीमती सुशीला पाटकर स्मृती पक्षी साहित्य पुरस्कार परभणी येथील पक्षी अभ्यासक तथा पक्षी व निसर्ग या विषयावर सातत्याने लेखन करणारे लेखक श्री. माणिक प्रल्हाद पुरी यांना जाहीर करण्यात आला. हा पुरस्कार ॲड. चंदना साळगावकर, मुंबई यांचे तर्फे प्रायोजित करण्यात आलेला आहे.

या पुरस्काराचे वितरण ३७ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनात करण्यात येणार असून यावर्षी महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन शेवगाव जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर) येथे दि. ०१-०२, फेब्रुवारी २०२५ दरम्यान होणार आहे. या पुरस्कारांचे वितरण संमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

**पक्षिमित्र जीवन गौरव पुरस्कार**



**श्री. गोविंद रघुनाथ सबनीस**
पंढरपूर

**पक्षी संवर्धन पुरस्कार**



**फिरोज गुलाब चाऊस**
निपाणी,बेळगांव

**पक्षी साहित्य पुरस्कार**



**श्री.माणिक प्रल्हाद पुरी**
परभणी


**पक्षी जनजागृती पुरस्कार**



**श्री. राहुल प्रदिप वकारे**
वर्धा

## पुस्तक समीक्षण

# थाई थाई



**डॉ. राजू कसंबे**
कार्याध्यक्ष,महाराष्ट्र पक्षीमित्र
Email - raju.bnhs@gmail.com

अत्यंत सुबक मुखपृष्ठ असलेले थाई थाई छोटेखानी पुस्तक लेखक आणि मित्र किरण मोरेनी सप्रेम दिल्यापासून ते वाचायची उत्सुकता लागून होती. शेवटी पुस्तक एकदा हाती घेतले आणि दोन दिवसात संपूर्ण वाचून काढले. खरे म्हणजे वाचायचे थांबावेच वाटले नाही!!


ह्या पुस्तकाला प्रवास वर्णन म्हणत येणार नाही. एखादा पक्षीमित्र थायलंडला 'आंतरराष्ट्रीय हॉर्नबिल परिषदेत' सहभागी होण्यासाठी जातो आणि आणखी काही दिवसाचा मुक्काम वाढवून तेथील जीवनमान, संस्कृति, खाद्य पदार्थ समजून घेण्याचा प्रयत्न करतो. परिषदेत काय शिकायला मिळाले ह्याच्या व्यतिरिक्त लेखक एका पक्षी निरीक्षकाच्या भिरभिरत्या नजरेने आजूबाजूचे जग न्याहाळतो, निरीक्षणे टिपत राहतो, त्याच्या नोंदी घेतो. एखादी गोष्ट नेमकी काय असेल ह्याचा खोलात जाऊन शोध घेतो. वेळप्रसंगी मध्य रात्री बाहेर पडून बँकॉक-पटाया ही शहरे का बरे बदनाम झाली असतील ह्याचा शोध घेतो. तिथल्या 'बूम बूम' संस्कृतीचा विविध पैलूने विचार करतो आणि मांडतो. पर्यटन वाढीच्या नादात केवळ करमणूक, नाइट लाईफ, सेक्स, देशात असलेल्या प्रत्येक गोष्टीतून पैसे कमवायचे (प्राणी संग्रहलयातील वाघ, ई.) हे सगळे वाढत गेले. त्या नादात तिथल्या जवळपास प्रत्येक घरातील मुलींना काय भोग भोगायला लागतात ते जाणवतं. 'अल्काजार शो' आणि त्यात काम करणाऱ्या 'लेडी बॉय'च्या मनातील हळव्या भावना लेखक हलकेच उलगडून दाखवतो. राजकुमारी विभावदीचा बंगला बघून तिच्याबद्दलचे लेखकाचे कुतूहल जागृत होते आणि तीची संपूर्ण कथा आपल्याला वाचायला मिळते.

आपले अनुभव लिहिताना सोबत असलेल्या इतर मित्रांची वर्णने आणि किस्से लेखक सांगत राहतो. आपण त्यांच्यासोबत फिरतोय, पटायाचा फेरफटका मारतोय, तिथले पदार्थ चाखतोय असे वाटायला लागते.

आणखी माझ्यासाठी आनंदाची गोष्ट म्हणजे हॉर्नबिल पक्ष्यावर लिहिलेल्या 'मायाळू धनेशाचे गुपित' ह्या माझ्या पुस्तकाचा दोनवेळा ह्या पुस्तकात उल्लेख येतो. 'थंडर बर्ड' ही जमीनीवर वावरणाऱ्या हॉर्नबिलची मला माहिती नसलेली गोष्ट वाचायला मिळते. प्रत्येक प्रकरणाची नावे छान आणि मजेशीर ठेवलेली आहेत.

किरण मोरे ह्याने पूर्वी लिहिलेली 'माळराणावरील चंडोल', व 'शबल' ही पक्ष्यांबद्दल लिहिलेली पुस्तके वाचली होती. यावेळेस प्रवास, पक्षी परिषद, थायलंडचे जीवनमान, तिथली, संस्कृति इतिहास, असे खुसखुशीत भाषेत अनुभव देणारे थाई थाई त्याने लिहिले. लेखकाची प्रगतीवर असलेली निरीक्षण-लेखन प्रगल्भता थाई थाई मध्ये दिसून येते. हे पुस्तक मला खूप भावले. म्हणून हा खटाटोप. तुम्ही पक्षीमित्र असाल, किंवा मराठी भाषिक असाल तर नक्की हे पुस्तक वाचा. भ्रमनिरास होणार नाही ह्याची खात्री.

पुस्तक : थाई थाई
लेखक : किरण मोरे.
मुखपृष्ठ : निनाद अभंग.
प्रकाशक : साहित्य प्रसार केंद्र, नागपूर.
मूल्य : रु.१५०/-



## रायगडातील पक्ष्यांचे छायाचित्र ई-प्रदर्शन

### वन्यजीव छायाचित्रकार व अभ्यासक शंतनु कुवेसकर यांच्या १०० छायाचित्रांचा समावेश

५ ते १२ नोव्हेंबर पक्षी सप्ताह साजरा केला जातो या निमित्ताने महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेतर्फे तीन वर्षांपूर्वी सन २०२१ मध्ये रायगड जिल्ह्यातील वन्यजीव अभ्यासक छायाचित्रकार शंतनु कुवेसकर यांनी निसर्ग संपन्न रायगड परिसरात टिपलेल्या अनेकविध पक्ष्यांचे सुंदर छायाचित्रांतून निवडक १०० छायाचित्रांचे रायगड जिल्ह्यातील समृद्ध पक्षी वैभव हे ई– प्रदर्शन ऑनलाईन आयोजित केले होते. त्यास संपूर्ण महाराष्ट्रातून उदंड प्रतिसाद लाभला, आज २०२४ साली सुद्धा हे प्रदर्शन सुरु असून प्रेक्षकांचे खास पसंतीस पात्र ठरत आहे.

रायगड जिल्ह्यात आजपर्यंत ४२८ पक्षी प्रजातींची अधिकृत नोंद आहे स्थलांतरित पक्षांसाठी येथे अनेक प्रकारचे पोषक नैसर्गिक अधिवास आहेत त्यामुळे चांगल्या संख्येने पक्षी दाखल होतात.

जिल्ह्यात वाढती बांधकामे, फार्म हाउस प्लॉटसाठी मोठ्या प्रमाणात मोकळ्या केल्या जाणाऱ्या जमिनी, हवा, पाणी आणि प्लास्टिकचे प्रदूषण सर्वच पक्षी आणि प्राण्यांच्या जीवावर बेतत असून त्यांचे नैसर्गिक अधिवास झपाट्याने बदलत व नष्ट होत आहेत. पक्षी प्राण्यांच्या नैसर्गिक क्रिया आणि अधिवास अबाधित ठेवण्याव्यतिरिक्त आपण इतर दुसरे कोणतेही काम करू शकत नाही आणि गरजही नाही. पक्ष्यांचे अधिवास नैसर्गिक जागा अबाधित कश्या राहतील आणि पक्षी प्राण्यांबद्दल कोणत्याही अंधश्रद्धा व गैरसमज पसरवले न जाता आपण मानवापासून त्यांना धोका उद्भवणार नाही त्यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्याची गरज आहे.

छायाचित्र प्रदर्शनात समाविष्ठ १०० छायाचित्रे रायगड जिल्ह्यातील मुख्यतः माणगांव, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, रोहा, तळा व अलिबाग तालुक्यातील निसर्ग संपन्न परिसरात शंतनु कुवेसकर यांनी दिवस रात्री भटकंती करुन, तासनतास निरीक्षणातून टिपलेली आहेत. शंतनु शालेय जीवनापासून गेली १५ वर्षे पर्यावरण क्षेत्रात मोठ्या जिद्दीने कार्यरत आहेत. त्यांच्या या प्रदर्शनाची पीडीएफ स्वरूपाची फाइल उपलब्ध झाली आहे. या १०० छायाचित्रांव्यतिरिक्त आणखी छायाचित्रे आणि चित्रफितींसाठी https://www.instagram.com/shantanukuveskar या पेजला फॉलो करा असे आवाहन त्यांनी केले आहे. रायगड जिल्ह्यातील पक्षी विश्वाचा अमूल्य ठेवा या प्रदर्शनाच्या माध्यमातून सर्वांपर्यंत पोहोचत आहे.

*****

## निसर्ग संवर्धन संस्थेतर्फे ५ नोव्हेंबर रोजी हतनूर धरणाच्या जलाशयावर पक्षी निरीक्षण

निसर्ग संवर्धन संस्थेतर्फे ५ नोव्हेंबर रोजी हतनूर धरणाच्या जलाशयावर मोफत पक्षी निरीक्षण, ओळख आणि मार्गदर्शनपर कार्यक्रम घेण्यात आला. पक्षी सप्ताहानिमित्त आयोजित या कार्यक्रमांत ११ पक्षीप्रेमींनी सहभाग घेतला. यात दुर्मिळ जंगली पिंगळा व बदामी तापस पक्षी आढळून आले.

रविवारी सकाळी ७ वाजता हतनूर धरण जलाशयावर पक्षी निरीक्षण करण्यासाठी सुरुवात झाली. सकाळी १० वाजेपर्यंत पक्षी निरीक्षण करण्यात्त आले. त्यात ६४ पक्षी प्रजाती आढळून आल्या. महत्वाचे म्हणजे जंगली पिंगळा आणि बदामी तापस हे दुर्मिळ पक्षी आढळून आले.

या उपक्रमात चातक निसर्ग संवर्धन संस्थेचे अध्यक्ष अनिल महाजन, सचिव उदय चौधरी, कार्यकारिणी सदस्य समीर नेवे, राजपालसिंग राजपूत, विलास महाजन, तर पक्षीप्रेमी पंकज भोळे, प्रा. अरुण फेगडे, प्रा.विलास सोळुंके,
लता सोळुंके, उमेश गोरधे, विरल सोळुंके इत्यादींनी पक्षी निरीक्षणाचा आनंद घेतला.

*****


## निसर्गसाथी फाऊंडेशन, हिंगणघाट व महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे पक्षी निरीक्षण

दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा निसर्गसाथी फाऊंडेशन, हिंगणघाट व महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे पक्षी निरीक्षण कार्यक्रम दिनांक १० नोव्हेबरला सकाळी शिरुड धरण येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने हिंगणघाट व वर्धा येथील पक्षी निरीक्षकांनी हजेरी लावली होती. हिवाळी व स्थानिक स्थलांतरीत आणि स्थानिक असे एकूण ५२ पक्षी प्रजातींच्या नोंदी करण्यात आल्या. राज्यातील पक्षांचे महत्व अधोरेखित होऊन जनसामान्यांपर्यंत त्यांचे संरक्षणाचे महत्व पोहचविण्यासाठी दरवर्षी महाराष्ट्र पक्षीसप्ताह साजरा केला जातो.

डॉ. बालाजी राजूरकर सर यांनी डॉ. सलीम अली याच्या जीवनावर थोडक्यात माहिती दिली. तसेच कु. अंजोर कडू हिने निसर्ग कवितेचे वाचन केले. शेवटी पद्मविभूषण डॉ सालीम अली यांना सन्मान देऊन श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. आभार प्रभाकर कोळसे यांनी मानले.

# चिंबोरी खाऊ

## Crab Plover (*Dromas ardeola*)



**रवींद्र वामनाचार्य**
नाशिक
E-mail ID : r_wamanacharya@yahoo.co.in

हा पक्षी समुद्र किनाऱ्यावर आढळणारा पक्षी आहे. हा पक्षी शुभ्र पांढऱ्या रंगाचा असतो, परंतु मानेपासून पाठीपर्यंतचा भाग व प्राथमिक पखांचा भाग काळया रंगाचा असतो, पाय लांब सडक व राखाडी रंगाचे असतात. चोच काळ्या रंगाची जाड व मजबूत असते.

हिंदी महासागराच्या किनाऱ्यावर व द्विपावर हे पक्षी आढळून येतात या पक्ष्याची स्थलांतर करण्याची सवय ही विशेष लक्षात रहाणारी बाब आहे असे निदर्शनास आले आहे की क्रॅब प्लोवर हे हजारो किमी अंतराचा प्रवास करताना हिवाळयात प्रजननासाठी भारताच्या दक्षिण पूर्वेला तामिळनाडू राज्यातील पॉईंट कलिमर वा ठिकाणास भेट देतात. हा किनार पट्टीचा भाग अधिवासासाठी योग्य असून खाद्याचा मुबलक साठा असल्याने स्थलांतरीत पक्षी याठिकाणी हमखास आढळतात. त्याचप्रमाणे गुजरात राज्यातील जामनगर जवळील समुद किनार पट्टीवर सुद्धा हा पक्षी बहुसख्येने आढळून आला आहे

हे पक्षी पाण्याजवळ, किनाऱ्यावर छोटया थव्यामध्ये चिबोरी शोधताना दिसतात मोठ्या आकाराचे सावज असेल तर हा पक्षी स्तब्ध रहातो ते सावज दिसताच मात्र त्याच्या दिशेने तीरासारखा धावतो आणि चोच खुपसतो लहान आकाराच्या भक्ष्यांकडे मात्र हळू हळू चालत जातो व ते धावणे आणि वेचणे टिपणे अशा पद्धतीन पकडतो. ओहोटीच्या वेळी किनाऱ्याला येणाऱ्या खेकडे, गांडुळ, जेलीफिश निवट्या हे त्यांचे खाद्य असतेः एप्रिल ते जुलै हा ह्याच्या विणीचा हंगाम असतो वाळूच्या ढिगातील बिळात अथवा खडयात है आपले घरटे बनवतात मादी एक किंवा दोन अंडी देते

भारतीय टपाल खात्याच्या तामिळनाडू विभागातर्फे दि. ५.१.२०२४ रोजी क्रॅब प्लोवर वर विशेष आवरण प्रकाशित काण्यात आले आहे, त्याबर या पक्ष्याची प्रतिमा व चित्रात्मक शिक्का दिसून येतो. तसेच ग्रेट ब्रिटनच्या टपाल तिकिटावर क्रॅब प्लोवर खेकड्याची शिकार करताना दिसत आहे.




*****

# वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था, अमरावती

४२, ग्रीन पार्क कॉलनी, आशियाड कॉलनी जवळ, शेगाव रोड अमरावती ४४४६०४
Email : wecsamt.2001@gmail.com Reg.No. MH/87/2001/AMT.

## कार्यकारिणी



प्रा. डॉ. अंजली देशमुख
अध्यक्ष



डॉ. जयंत वडतकर
सचिव



प्रा. डॉ. गजानन वाघ
कोषाध्यक्ष



प्रा. डॉ. श्रीकांत वऱ्हेकर
उपाध्यक्ष



प्रा. डॉ. मंजुषा वाठ
सहसचिव



श्री. किरण मोरे
सदस्य



प्रा. डॉ. रमेश चोंढेकर
सदस्य



श्री. सौरभ जवंजाळ
सदस्य



श्री. मनिष ढाकुलकर
सदस्य

## संस्थेचे उल्लेखनीय उपक्रम

- २६ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाचे आयोजन (२०१३)
- ११ विदर्भ पक्षिमित्र संमेलनाचे आयोजन (२०११)
- Ornithology workshop series (2010) चे BNHS च्या सहकार्याने आयोजन.
- Birdlife international UK/ BNHS सहकार्याने Forest Owlet पक्ष्यावर सातपूड्यात संशोधन प्रकल्प यशस्वी रित्या पुर्ण.
- RRCF, मुंबईच्या सहकार्याने मेळघाटातील Owls & Owlet, या पक्षावर संशोधन प्रकल्प पुर्ण.
- अमरावती जिह्यातील पक्षांचा अभ्यास व पक्षीसुचिचे प्रकाशन (२०१० व २०१६)
- पक्षिविषयक पुस्तकांचे प्रकाशन -०४
- २००५ सालापासून ''मातिचे गणपती बसवा'' हा पर्यावरण जनजागृती कार्यक्रम.
- BAIF, पुणे यांचे सहकार्याने विविध प्रकल्पांचे यशस्वी आयोजन.
- वनविभागाच्या सहकार्याने विविध अभयारंण्यामध्ये व व्याघ्र प्रकल्पांमध्ये पक्षी अभ्यास प्रकल्प यशस्वी पूर्ण.
- अमरावती जिल्ह्याच्या जैवविविधता नोंदवहीच्या निर्मितीमध्ये संस्थेचा सहभाग.
- पोहोरामालखेड जंगलाच्या जैवविविधतेचा अभ्यास व FES च्या सहकार्याने पुस्तीकेचे प्रकाशन

## सल्लागार



श्री. मिलिंद चिमोटे



प्रा. डॉ. पी. बी. रघुवंशी



डॉ. राजु कसंबे

छायाचित्राची गोष्ट

## भिगवनच्या पक्षीमेळ्यातील मुकूटमणी बहिरी ससाणा




पाण्यात बरेच अंतर कापल्यानंतर एका खांबाजवळ संथपणे थांबलो तर त्यावरती एक राखाडी रंगाचा राजबिंडा पक्षी बसलेला दिसला. व्यवस्थित निरखून बघितल्यावर आपण चित्रामध्ये बघितलेला हाच तो बहिरी ससाणा ह्याची जाणीव झाली. एवढा आनंद झाला होता कि त्याला काही क्षण बघतच राहिले, फोटो काढायचे विसरूनच गेले.

संपूर्ण लेख छायाचित्राची गोष्ट या सदरामध्ये पान क्र. १७ वर



छायाचित्रकार
**सौ.समृद्धी पानसरे**
पुणे

Book Post

प्रती,

प्रेषक :
**महाराष्ट्र पक्षीमित्र**
६३, अरण्यार्पन समता कॉलनी,
कठोरा रोड, अमरावती.
४४४६०४
*E-mail : pakshimitra@gmail.com*
*website : www.pakshimitra.org*
*Mob.+91 7030101981*

**पक्षिमित्र**
संपादक : किरण मोरे
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : ज्ञानपथ प्रकाशन
मुद्रक : ज्ञानपथ प्रकाशन